



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २५९ * नांदेड * मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# आपण कुठेही आणि कुणासोबतही जाणार नाही, यायचं असेल तर आमच्यासोबत या -शरद पवार

**मुंबई (प्रतिनिणी)–** गेल्या अनेक महिन्यांपासून राजकीय वर्तुळात शरद पवार हे भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएसोबत जाणार, असा चर्चा रंगल्या होत्या. मध्यंतरी पंतप्रधान मोदी यांच्याशी भेट झाल्यामुळे या चर्चांना आणखीनच हवा मिळाली होती. मात्र, सोमवारी मुंबईत पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्यात शरद पवार यांनी आपण एनडीएसोबत जाणार नसल्याचे स्पष्ट केले.

त्यासोबतच शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री आणि अजित पवार गटाच्या सर्वेसर्वा सुनेत्रा पवार यांना अप्रत्यक्षरित्या संदेश दिला. आपल्याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. हो, चर्चा सुरू आहे. मला त्यांना सांगायच आहे. आपण कुठेही जाणार नाही. आम्ही कुणासोबत जाणार नाही. यायचं असेल तर आमच्यासोबत या, असे शरद पवार यांनी सांगितले. त्यामुळे आगामी



काळात शरद पवार यांचा पक्ष राज्यात महाविकास आघाडी आणि देशपातळीवर इंडिया आघाडीसोबत राहून काम करेल, हे स्पष्ट झाले आहे.

मध्यंतरी शरद पवार हे भाजपसोबत हातमिळवणी करुन एनडीए आघाडीत सामील होतील, अशी जोरदार चर्चा होती. त्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलिनीकरण होईल, अशीही वदंता होती. मात्र, शरद पवार यांनी या सर्व शक्यता पार धुडकावून लावल्या आहेत. शरद पवार यांनी आज पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीतील चर्चे विषयीही माहिती दिली. आम्ही अडीच तास एकत्र बसलो आहोत. मला अनेक वेगवेगळ्या मागण्या दुष्काळाचा निमित्ताने ऐकायला मिळाल्या. प्रांताध्यक्ष यांनी सूचना दिल्यानुसार आपण काय निवेदन आंदोलन करताना द्यायच्या आहेत, हे सांगितलं आहे. राज्य सरकारने काय काय देणे अपेक्षित आहे त्याचे निवेदन दिलं आहे. आम्ही दोन चार दिवसांत सरकारकडे याबाबत आग्रह करू. आपल्याला भांडण करायचं नाही जर मागण्या मान्य झाल्या नाहीत तर रस्त्यावर उतरून संघर्ष करु, असे शरद पवार यांनी म्हटले.

### शरद पवारांच्या वक्तव्याचा अर्थ काळाच्या ओघात समजेल –सुनील तटकरे

शरद पवार हे ६ दशकांपासून देशाचं नेतृत्व करतात. त्यामुळे, त्यांच्या वक्तव्याचा अर्थ अनेकदा कोणाला कळलासुद्धा नाही, म्हणून साहेबांच्या वक्तव्याचं उत्तर काळाच्या ओघातच मिळेल, असे सुनील तटकरे यांनी म्हटलं. तसेच, दुष्काळ परिस्थितीवरील शासन निर्णयावर शरद पवारांनी नाराजी दर्शवली आहे, यासंदर्भात बोलताना सुनिल तटकरे म्हणाले की, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सरकारने पाऊलले उचलली आहेत. राज्यातील महायुती सरकार संवेदनशील आहे, सध्या ट्रीगर १ नुसार दुष्काळी तालुक्यांची पहिली आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. केंद्र सरकारकडूनची मदत आम्हाला अपेक्षित आहे. शेतकऱ्यांची बाजू सरकारकडे मांडणे हा शरद पवारांचा स्थायी भाव आहे, ते त्यांच्या अनुभवातून मांडत असतात, असे उत्तर तटकरे यांनी दिले.

## अभिजीत दिपके करणार आता जेलभरो आंदोलन

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईत २ ऑक्टोबर रोजी ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात होणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी) च्या जेलभरो आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. परवानगी नाकारल्यानंतर सीजेपी आक्रमक झाली असून, आता निवडणूक आयोगाविरोधात जेलभरो आंदोलन करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. या आंदोलनाला ठाकरे सेनेने पाठिंबा दर्शवला आहे.

पोलिसांनी परवानगी नाकारताना शिवाजी पार्कमध्ये (छत्रपती शिवाजी महाराज पार्क) कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी देण्याचे अधिकार पोलिसांना नाहीत, असे पत्राद्वारे सीजेपीला कळवले आहे. यावर, अभिजीत दिपके यांनी मुंबई पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी ट्वीट करत सवाल केला की, एकनाथ शिंदे यांच्या सभेला शिवाजी पार्कमध्ये परवानगी कशी दिली गेली? त्यांनी शिंदेंच्या सभेचा व्हिडिओ देखील पोस्ट केला. नागरिकांचा आवाज दाबण्यासाठी असे प्रकार अस्वीकार्य असल्याचे दिपके यांनी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळण्यासाठी शासनाचे प्रयत्न –महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### नांदेड जिल्ह्यातील उर्वरित दोन तालुक्यांचाही समावेश करणार

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठवाडा व विदर्भाचा दौरा करून राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर, अठरापगड जाती आणि बारा बलुतेदारांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळावी, यासाठी अचूक पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे दिली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अर्धापूर येथे दुष्काळसदृश पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतातील पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी आस्थेवाईकपणे संवाद साधला. पावसातील खंड, पिकांचे नुकसान आणि सद्यःस्थितीबाबत शेतकऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, त्यांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

राज्यातील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी आपल्या अध्यक्षतेखाली ११ मंत्र्यांची उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीची बैठक दर मंगळवारी घेण्यात येणार असून, शेतकरी, शेतमजूर, अठरापगड जाती आणि बारा बलुतेदारांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी समिती काम करणार आहे. राज्यात पिकांची परिस्थिती गंभीर असून, रब्बी हंगामही अडचणीत आला आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.



शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे आवश्यक असून, दिवाळीपूर्वी मदत मिळावी, अशी शासनाची भूमिका आहे. शेतकऱ्यांच्या हिताला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असून, संकटाच्या काळात शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नांदेड जिल्ह्यातील दोन तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश होणे अद्याप बाकी आहे. या दोन्ही तालुक्यांचाही दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

ज्या धरणांमध्ये सध्या पाणीसाठा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी उभी असलेली पिके वाचविण्यासाठी एक पाणी देण्याबाबत शासन विचार करीत आहे. तसेच नगरपंचायत क्षेत्रात बळीराजा पाणंद रस्ते आणि जीरामजी योजना लागू करण्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत विचार करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

या पाहणी दौऱ्यावर खा. अशोकराव चव्हाण, खा.डॉ. अजित गोपछडे, आ. श्रीजया चव्हाण, भाजप नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, जिल्हाध्यक्ष संतुक हंबर्डे, माजी सभापती किशोर स्वामी, सभापती संजय देशमुख लहानकर, भाजपाचे एकनाथ पवार, माजी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणकर, नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, संचालक निळकंठ मदने, उद्योजक राजू बारसे, शहराध्यक्ष योगेश हाळदे, संचालक व्यंकटराव साखरे, उपनगराध्यक्ष मुक्तेदर पठाण, डॉ.विशाल लंगडे, अभिषेक गुरखेल, बाबुराव लंगडे, प्रल्हादराव माटे, सोनाजी सरोदे, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरूराज रणखांब, माधवराव शिंदे, बाळू पाटील धुमाळ, गोविंद कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी महेश पाटील, तहसीलदार रेणुकादास देवणीकर, गटविकास अधिकारी यु.डी.तोटावाड, सहकार अधिकारी अरुणाताई केंद्रे, पोलिस निरीक्षक महादेव मांजरमकर, उपविभागीय अभियंता सिद्धेश्वर मिना, अभियंता अमोल नरवाडे, शेतकरी ज्ञानेश्वर माटे, शिवशंकर वाघमारे, संभाजी माटे, साईनाथ लंगडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्यावर महसूल विभागाची कारवाई

**मुंबई (प्रतिनिधी)–** मनोज जरांगे पाटील यांच्या कोअर कमिटीतील सदस्य संजय नानासाहेब कटारे यांच्याशी संबंधित अवैध वाळू उत्खनन प्रकरणात महसूल विभागाने कारवाई केली आहे. अंबड तालुक्यातील साष्टपिंपळगाव आणि डोमलगाव येथील गोदावरी नदीपात्रातून सुमारे दोन हजार ब्रास वाळू उत्खननाच्या प्रकरणात कटारे यांना ४ कोटी ९० लाख ७२ हजार २०० रुपयांच्या दंडात्मक कारवाईतून वगळणारा तत्कालीन तहसीलदारांचा सुधारित आदेश अंबडच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी रद्द केला आहे.

## आमदार–खासदारांच्या पत्रांना दोन महिन्यांत उत्तर बंधनकारक; सामान्य प्रशासन विभागाचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** आमदार आणि खासदारांनी शासकीय कामांबाबत पाठविलेल्या पत्रांवर तातडीने कार्यवाही करून जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत अंतिम उत्तर द्यावे, तसेच सरकारी कार्यालयांत भेटीस येणाऱ्या लोकप्रतिनिधींना सौजन्याची वागणूक द्यावी, असे निर्देश राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने दिले आहेत.

लोकप्रतिनिधींच्या पत्रव्यवहाराचा कार्यालय प्रमुखांनी दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा. याशिवाय आमदार–खासदारांच्या भेटी आणि त्यांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या गुरुवारी दोन तासांचा वेळ राखून ठेवण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

आमदार आणि खासदारांसोबत सौजन्यपूर्ण वागणुकीबाबत यापूर्वी जारी करण्यात आलेली विविध परिपत्रके एकत्रित करून राज्य सरकारने सुधारित आणि सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे सोमवारी शासन निर्णयाद्वारे जारी केली. त्यानुसार लोकप्रतिनिधी कार्यालयात भेटीस आल्यानंतर त्यांना आदराची आणि सौजन्याची वागणूक देणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधतानाही आदरयुक्त भाषा आणि शिष्टाचाराचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## आशियाई क्रीडा स्पधेत भारताचा संघ उपांत्य फेरीत

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारतीय क्रिकेट संघ आशियाई क्रिडा स्पर्धेत उपांत्य फेरीत पोहचली आहे. पाऊस आणि खराब मैदानाच्या स्थितीमुळे अफगाणिस्तानविरूद्ध भारतीय संघाला साधा टॉसही करता आला नाही. बीसीसीआयने सांगितल्याप्रमाणे पावसामुळे भारत आणि अफगाणिस्तानमधील हा सामना रद्द करण्यात आला आहे. योग्य मानांकनाच्या आधारावर भारतीय संघ उपांत्य फेरीत पोहचली आहे.

कारोगी एथलेटिक पार्कमध्ये जेव्हा मॅच रेफ्रीने सामना रद्द झाल्याची घोषणा केली तेव्हा दोन्ही संघाचे कर्णधार एकमेकांना हात मिळवताना दिसून आले. याचा अर्थ आता अफगाणिस्तानचा प्रवास इथेच थांबला आहे आणि भारत आता गोल्ड मेडल मिळविण्याच्या शर्यतीत पुढे गेला आहे.

## मुदखेडच्या शेतकऱ्यांचा तहसील कार्यालयावर आक्रोश; दुष्काळी यादीत समावेशासाठी आंदोलन



**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड तालुका दुष्काळी यादीतून वगळण्यात आल्याच्या निषेधार्थ सोमवारी ठाकरे चौक ते तहसील कार्यालय, मुदखेड असा शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. बालाजी गाडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शेतकरी, नांदेड जिल्हा युवक काँग्रेस, मुदखेड तालुका काँग्रेस कमिटी आणि समविचारी पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

मुदखेड तालुक्यात खरीप हंगामात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असताना तालुक्याला दुष्काळी यादीतून वगळण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. पिके उद्धवस्त झाली, उत्पादनावर परिणाम झाला, शेतकरी आर्थिक संकटात आहे; मात्र मदत आणि सवलतींच्या वेळी मुदखेड तालुक्याला दुष्काळी यादीबाहेर ठेवण्यात आले, या मुद्द्यावर आजच्या मोर्चात शेतकऱ्यांनी आक्रोश व्यक्त केला.

मोर्चादरम्यान मुदखेड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करा, शेतकऱ्यांना न्याय द्या अशा घोषणांनी तहसील कार्यालय परिसर दणाणून गेला. यावेळी तहसील प्रशासनाला निवेदन देऊन मुदखेड तालुक्याचा दुष्काळी यादीत तातडीने समावेश करावा, खरीप पिकांच्या नुकसानीचा फेरआढावा घ्यावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी तसेच कर्ज पुनर्गठनासह **(पान ५ वर...)**

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेसचे आंदोलन; राजीनाम्याची मागणी


**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणूक प्रक्रियेत भ्रष्ट कारभार केल्याचा आणि वोट चोरी केल्याचा आरोप करत शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने सोमवारी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आणि उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने हे आंदोलन करण्यात आले.



निवडणूक आयोगाने निः पक्षपातीपणे काम करणे अपेक्षित असताना, ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील आयोगाने भाजपच्या हिताचे काम केले आहे. याबाबत लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी वेळोवेळी पर्दाफाश केला आहे. नुकतेच एका राष्ट्रीय प्रसारमाध्यमाने निवडणूक आयोगातील मतभेद जगजाहीर करत वोट चोरीवर शिक्कामोर्तब केले आहे, त्यामुळे ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, असे प्रतिपादन खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केले.

या आंदोलनात माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, डॉ. यशपाल भिंगे, डॉ. दिनेश निखाते, डॉ. श्रावण रेपनवाड, डॉ. रेखा चव्हाण, सुरेंद्र घोडजकर, राजेश पावडे, अब्दुल सत्तार, आनंद चव्हाण, संजय बेळगे, संजय कऱ्हाळे, प्रा. अनंत राऊत, कुमार कुर्तडीकर, महेश देशमुख तरोडेकर, प्रा. मनुरकर, आनंदराव गुंडिले, नगराध्यक्ष रफिक भाई, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, शेख पाशा, शोहेब हुसेन, मोसीम खान, शहबाज फैज, राजू गोडबोले, मो. इब्राहिम, सचिन टाले, सुरेश हटकर, गोविंदबाबा गौड, विनोद कांचनगिरे, तातेराव शिंदे, अजीज कुरेशी, मुन्तजिब, अतुल पेदेवाड, गणेश ढगे, शंकर शिंदे, सुरज शिंदे, अक्षय नळगे, ज्योती कदम, जेसिका शिंदे, नसीम पठाण, सुरेखा वैद्य, विमल किर्तने, शेर अली, गगन यादव, प्रवीण कानगुले, दीपकसिंग हुजारिया, बापूसाहेब पाटील, अब्दुल रहीम, रमेश चित्ते, आनंद कल्याणकर, संदीप देशमुख, संजय वाघमारे, शिवहरी गाडे, निरंजन पावडे, नागराज सुलगेकर, राजू बोळसेकर, अभिलाष पावडे, व्यंकट मोरे, प्रताप देशमुख, जसपालसिंग तबेलेवाले, आंबादास रातोळे, संदीप काळबांडे, **(पान ५ वर...)**



## दोन चिमुकल्यांचा खून करून आत्महत्या केलेल्या शिक्षकाच्या पत्नीचीही आत्महत्या; चार दिवस मृत्यूशी दिली झुंज

**नांदेड (प्रतिनिधी)–** हिमायतनगर तालुक्यातील पोटा येथे कार्यरत असलेल्या जिल्हा परिषद शाळेवरील शिक्षक सुनील मोरे (४५) राहणार बेंबर तालुका भोकर, हल्ली मुक्काम सांगवी गोपाळनगर यांनी आपल्या दोन चिमुकल्यांचा खून करून गोदावरी नदीपात्रात १७ जुलै २०२६ रोजी आपली कार टाकून स्वतः ही आत्महत्या केली होती. या प्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या चार आरोपींचा जामीन झाल्यानंतर नैराश्यातून शिक्षिका असलेल्या त्यांच्या पत्नीनेही गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना उघडकीस आल्याने जिल्ह्यात व पुन्हा शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे.

शिक्षक सुनील मोरे याने आपल्यावर शिक्षण विभागाकडून सापत्न वागणूक मिळत आहे. माझ्या अनेक मागण्यांवर शिक्षणाधिकाऱ्यांनी न्याय दिला नाही. उलट मलाच नोटीस बजावून त्रस्त करून टाकले होते. हदगाव तालुक्यातून हिमायतनगर तालुक्यात ज्या ठिकाणी शून्य पटसंख्या आहे अशा शाळेवर बदली केली आणि तब्बल नऊ महिन्यापासून या शिक्षक दांपत्याला जिल्हा परिषदेकडून वेतन करण्यात आले नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आणि अखेर या त्रासाला कंटाळून शिक्षक सुनील मोरे यांनी आपल्या व्हॉट्सअॅप स्टेटस ठेऊन केली.

तत्कालीन हदगावचे व सध्या अमरावती येथील गटशिक्षणाधिकारी किशन फोले, विस्तार अधिकारी सूर्यकांत बाचे, केंद्रप्रमुख शिवाजी कदम आणि सहशिक्षक दत्ता पवळे यांचे नावे लिहून आत्महत्या केली होती. त्यात त्यांनी माझ्या मुलांना संपवून मी आत्महत्या करत असल्याचे लिहून ठेवून गोदावरी नदी पात्रात आमदुरा तालुका मुदखेड शिवारात आपल्या कारसह आत्महत्या केली होती. या प्रकरणात नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त करणे आणि अॅट्रॉसिटी अॅक्टअंतर्गत वरील चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे हे या प्रकरणाचा तपास करत होते. या प्रकरणातील चारही आरोपी पोलिसांना शेवटपर्यंत सापडले नाही. अखेर त्यांना न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर झाला. यादरम्यान त्यांची पत्नी धम्मशिला लक्ष्मणराव कवठेकर/ मोरे (४१) ह्या शहराच्या गणेशनगर भागात त्यांची बहीण लता कवठेकर यांच्याकडे राहत होत्या. पती व दोन्ही मुलं गेल्याने त्या घटनेच्या दिवसापासून नैराश्यात वावरत होत्या. अखेर त्यांनी २४ सप्टेंबर रोजी धम्मशिला यांनी बहिणीच्या घरी ओढणीने **(पान ५ वर...)**

## अर्धापूर तालुक्यातील चाभरा शिवारात बिबट्याचा वावर, हल्ल्यात गाय ठार

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील चाभरा शिवारात सरपंच सदाशिव विश्वनाथ चाभरकर यांच्या शेतातील आखाड्यावर बांधलेल्या गाईवर बिबट्याने भीषण हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात बिबट्याने गाईसह तिच्या पोटातील (गर्भातील) वासराचाही फडशा पाडला. ही धक्कादायक घटना सोमवार, दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी उघडकीस आली.

चाभरा शिवारात बिबट्याचा नेहमीच वावर असतो. सात वर्षांपूर्वी याच शिवारात एक बिबट्या विहिरीत पडला होता. आता पुन्हा एकदा बिबट्याने शेतकऱ्याच्या गाईवर हल्ला करून गाय व तिच्या पोटातील वासराचा बळी घेतल्याने परिसरात दहशत पसरली आहे.

बिबट्याच्या या वाढत्या हल्ल्यांमुळे चाभरा आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने तातडीने या बिबट्याचा बंदोबस्त करून शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरांचे होणारे नुकसान टाळावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. आता याप्रकरणी वनविभाग काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# मुलांच्या हातातील मोबाईलला लगाम?

सोशल मीडिया आजच्या पिढीच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. संवाद, माहिती, शिक्षण, मनोरंजन आणि व्यक्त होण्याचे व्यासपीठ म्हणून त्याचे महत्त्व नाकारता येणार नाही. मात्र, याच माध्यमाचे व्यसन मुलांच्या मानसिक आरोग्यावर घाला घालत असेल, तर त्याकडे केवळ तंत्रज्ञानाचा प्रश्न म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. मेटाने किशोरवयीन मुलांसाठी स्क्रीन टाइम मर्यादित करण्याचा आणि रात्री सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणण्याचा घेतलेला निर्णय त्यामुळे महत्त्वाचा असला, तरी तो अंतिम उपाय निश्चितच नाही. किशोरवयीन मुलांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अधिकाधिक वेळ खिळवून ठेवण्यासाठी तयार केलेली यंत्रणा ही या समस्येच्या मुळाशी आहे. सतत येणाऱ्या नोटिफिकेशन्स, शॉर्ट व्हीडीओंचा अखंड प्रवाह, 'लाईक' आणि 'फॉलोअर्स'ची स्पर्धा, पुन्हा पुन्हा समोर आणलेली आवडती सामग्री, या सगळ्यांमुळे मुलांचे लक्ष काही क्षणांपुरतेही स्थिर राहणे कठीण होत आहे. स्क्रीनपासून दूर राहणे म्हणजे काहीतरी गमावल्याची भावना निर्माण होणे, ही डिजिटल व्यसनाची धोकादायक पायरी आहे. मेटाने १८ वर्षांखालील मुलांसाठी दररोज दोन तासांचा स्क्रीन टाइम, रात्रीच्या वापरावर निर्बंध आणि वयाची अधिक कठोर पडताळणी यांसारखे उपाय स्वीकारले आहेत. कंपनीवर मुलांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या आणि त्यांना प्लॅटफॉर्मवर अधिक वेळ ठेवणाऱ्या पद्धती वापरल्याचे आरोप झाल्यानंतर हा बदल होत आहे. अब्जावधी डॉलरच्या दंडाची शक्यता आणि कायदेशीर दबाव यामागे असला तरी या निर्णयातून सोशल मीडिया उद्योगाच्या व्यवसाय मॉडेलवरच मूलभूत प्रश्न उपस्थित होतो. कारण प्रश्न केवळ मुलांनी किती वेळ मोबाईल वापरावा हा नाही. प्रश्न असा आहे की, मुलांनी मोबाईल किती वेळ वापरावा, हे ठरवणाऱ्या यंत्रणेवर नियंत्रण कोणाचे असावे? जर एखाद्या कंपनीचा नफा वापरकर्त्याने अधिकाधिक वेळ स्क्रीनवर घालवण्यावर अवलंबून असेल, तर मुलांच्या हिताला आणि कंपनीच्या व्यावसायिक हिताला संघर्ष निर्माण होणारच. अशा परिस्थितीत स्वयंनियमनावर अवलंबून राहणे कितपत योग्य, हा प्रश्न सरकारांनीही गांभीर्याने विचारायला हवा. तज्ज्ञांच्या चिंतेचा दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे झोप आणि मानसिक आरोग्य. रात्री उशिरापर्यंत मोबाईल पाहण्याची सवय मुलांच्या झोपेच्या वेळेवर परिणाम करू शकते. झोपेची कमतरता, चिडचिड, एकाग्रतेचा अभाव आणि अभ्यासातील अडचणी यांचे दुष्परिणाम पुढे दिसू शकतात. मात्र, सोशल मीडिया बंद केला म्हणून मुलांचे मानसिक प्रश्न आपोआप संपतील, असा निष्कर्ष काढणेही चुकीचे ठरेल. उलट काही मुलांसाठी सोशल मीडिया हा त्यांच्या सामाजिक जगाचा एक महत्त्वाचा भाग असतो. मित्रांशी संवाद, समान आवडीच्या लोकांशी संपर्क आणि स्वतःला व्यक्त करण्याची संधी त्यातून मिळते. त्यामुळे अचानक आणि कठोर निर्बंध लादण्याऐवजी डिजिटल साक्षरता, विवेकी वापर आणि पालकांचे मार्गदर्शन अधिक प्रभावी ठरू शकते. येथे पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुलाच्या हातात मोबाईल देऊन त्याला शांत ठेवणे आणि नंतर त्याच्या स्क्रीन टाइमबद्दल चिंता व्यक्त करणे, हा विरोधाभास आहे. पालकांनी स्वतःच्या डिजिटल सवयींकडेही पाहिले पाहिजे. घरातील प्रत्येक व्यक्ती सतत मोबाईलमध्ये गुंतलेली असेल, तर मुलांना 'स्क्रीन कमी वापरा' असा उपदेश किती परिणामकारक ठरेल? शाळांनीही या प्रश्नापासून दूर राहता कामा नये. डिजिटल नागरिकत्व, सोशल मीडिया शिष्टाचार, सायबर छळ, चुकीची माहिती, ऑनलाईन तुलना आणि मानसिक आरोग्य याबाबत मुलांना समजावून सांगणे ही आजच्या शिक्षणाची गरज आहे. केवळ अभ्यासक्रमातील गुण मिळविण्याची स्पर्धा मुलांना भविष्यासाठी तयार करणार नाही; डिजिटल जगात स्वतःवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता त्यांना शिकवावी लागेल. मेटाचे नवे नियम स्वागतार्ह आहेत; पण त्याकडे समस्येचे उत्तर म्हणून नव्हे, तर पहिले पाऊल म्हणून पाहिले पाहिजे. मुलांना सोशल मीडियापासून पूर्णपणे तोडणे हा उपाय नाही आणि त्यांना अल्गोरिदमच्या हवाली करणेही योग्य नाही. तंत्रज्ञान माणसासाठी असावे, माणूस तंत्रज्ञानाच्या नफ्याचे साधन बनू नये. आज प्रश्न फक्त दोन तासांचा नाही. प्रश्न आहे तो त्या दोन तासांत मुलांच्या मनावर काय परिणाम होतो आणि उर्वरित बावीस तासांत त्यांच्याकडे जगण्यासाठी काय उरते? मोबाईलचा स्क्रीन काळोखात बंद होणे पुरेसे नाही; मुलांच्या आयुष्यात खेळ, पुस्तक, संवाद, मैत्री, कुटुंब आणि प्रत्यक्ष जगण्याचा प्रकाश वाढला पाहिजे. तेव्हाच डिजिटल नियंत्रणाला खऱ्या अर्थाने मानवी चेहरा मिळेल.

# जागतिक हृदय दिन : हृदय आरोग्य आणि जीवनशैलीचे सामाजिक प्रतिबिंब



हृदय हे शरीराचा सर्वात महत्त्वाचा अवयव आहे. ते केवळ रक्तपुरवठ्याचे केंद्र नाही, तर आपल्या जीवनाचे प्रतीक आणि आपल्या शारीरिक, मानसिक व सामाजिक स्वास्थ्याचे मूळ आहे. हृदयाच्या कार्यात लक्षणीय बिघाड होणे म्हणजे फक्त वैयक्तिक आरोग्यावर परिणाम होणे नाही, तर त्याचा परिणाम कुटुंब, समाज आणि देशाच्या सामाजिक व आर्थिक जीवनावरही होतो.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत अनियमित आहार, व्यायामाचा अभाव, तणाव, धूम्रपान आणि मद्यपान यामुळे हृदयरोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. या परिस्थितीत हृदय आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे अत्यंत गरजेचे ठरते. जागतिक हृदय दिन, जो दरवर्षी २९ सप्टेंबरला साजरा केला जातो, हा दिवस हृदयरोग प्रतिबंध, जीवनशैलीतील सुधारणा आणि सामाजिक आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी समर्पित आहे. २०२५ मध्ये हा दिवस Don't Miss a Beat (एकही क्षण चुकवू नका) या थीमसह साजरा केला जात आहे, ज्याचा उद्देश हृदयाचे आरोग्य टिकवणे आणि वेळेवर उपचार घेण्याचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

जागतिक हृदय दिनाची सुरूवात २००० साली वर्ल्ड हार्ट फेडरेशन (WHF) आणि जागतिक आरोग्य संघटना (WHO) यांच्या संयुक्त प्रयत्नांनी झाली. या दिवसाच्या माध्यमातून हृदयरोगांविषयी जनजागृती निर्माण करणे, लोकांना हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी आवश्यक जीवनशैली अवलंबण्यास प्रोत्साहित करणे आणि वेळेवर वैद्यकीय तपासण्या करण्याचे महत्त्व सांगणे हे उद्दिष्ट आहे. प्रत्येक वर्षी या दिवसासाठी विशिष्ट थीम निश्चित केली जाते, ज्यातून त्या वर्षीच्या सामाजिक आरोग्य संदेशावर भर दिला जातो.

या वर्षीची थीम Don't Miss a Beat (एकही क्षण चुकवू नका) अत्यंत प्रभावी आणि विचारप्रवर्तक आहे. हृदयरोगामुळे अनेक कुटुंबे आपल्या प्रियजनांना गमावतात, ज्याचा मानसिक, आर्थिक आणि सामाजिक स्तरावर गंभीर परिणाम होतो. या थीमद्वारे लोकांना हृदयाचे लक्षण ओळखण्याचे, नियमित तपासण्या करण्याचे, योग्य आहार व व्यायाम करण्याचे आणि मानसिक ताण कमी करण्याचे संदेश दिले जात आहेत. सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने हृदयरोग प्रतिबंधित केल्यास केवळ वैयक्तिक जीवन सुधारते असे नाही, तर समाजातील कार्यक्षमतेत वाढ होते, आर्थिक स्थैर्य टिकते आणि कुटुंषलयांचे कल्याणही सुनिश्चित होते.

जागतिक स्तरावर हृदयरोग हे मृत्यूचे प्रमुख कारण मानले जाते. दरवर्षी २०.५ दशलक्ष लोक हृदयरोगांमुळे मृत्यूमुखी पडतात, जे जागतिक मृत्यूंच्या तिसऱ्या भागापेक्षा जास्त आहेत. तथापि, योग्य जीवनशैली अवलंबल्यास आणि वेळेवर वैद्यकीय तपासण्या केल्यास सुमारे ८०% हृदयरोग प्रतिबंध करता येऊ शकतात. भारतात हृदयरोगांचा प्रादुर्भाव चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांमध्ये हृदयरोगांचा धोका वाढला असून, विशेषतः २५ ते ५० वयोगटातील तरुणांमध्ये या आजाराचे प्रमाण वाढले आहे. यामागे अयोग्य आहार, जंक फुडचा अधिक प्रमाणात वापर, व्यायामाचा अभाव, तणाव आणि धूम्रपान-मद्यपान यांसारखी जीवनशैलीशी संबंधित कारणे आहेत. महिलांमध्ये हृदयरोगाचे प्रमाण कमी असल्याचे जाणवत असले तरी, आधुनिक जीवनशैलीमुळे त्यांच्यातही हृदयरोगांचा धोका वाढला आहे.

हृदयाचे आरोग्य हा फक्त वैयक्तिक प्रश्न नाही, तर तो सामाजिक आरोग्याशी थेट संबंधित आहे. निरोगी व्यक्ती आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी कार्यक्षम असते. हृदयरोगामुळे एखाद्या व्यक्तीचे मानसिक, शारीरिक आणि आर्थिक जीवन प्रभावित होते, ज्यामुळे कुटुंबात तणाव निर्माण होतो, कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता कमी होते आणि सामाजिक संबंधांवर परिणाम होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हृदयरोग प्रतिबंध म्हणजे सामाजिक स्थैर्य टिकवणे, आरोग्य सेवा वापरण्याचा भार कमी करणे आणि समाजातील लोकांच्या जीवनमानात सुधारणा करणे होय. हृदयाचे आरोग्य टिकवण्यासाठी जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल करणे आवश्यक आहे. त्यामध्ये संतुलित आहार, ज्यामध्ये ताज्या भाज्या, फळे, संपूर्ण धान्ये, कमी साखर आणि कमी फॅट असलेले पदार्थ यांचा समावेश असतो, तो हृदयासाठी उपयुक्त ठरतो. दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करणे, चालणे, धावणे, योगा किंवा नृत्य यांसारख्या क्रियांचा समावेश करणे, यामुळे हृदयाचे कार्य सुधारते आणि रक्ताभिसरण सुसंगत राहते. तणाव व्यवस्थापनासाठी ध्यान, योगा आणि श्वासोच्छ्वासाचे तंत्र वापरणे फायदेशीर ठरते. धूम्रपान आणि मद्यपान टाळणे हृदयरोग प्रतिबंधासाठी अत्यावश्यक आहे. तसेच रक्तदाब, कोलेस्ट्रॉल आणि इतर आरोग्य घटकांची नियमित तपासणी करणे गरजेचे आहे. या सर्व उपायांनी व्यक्तीचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्वास्थ्य सुधारते, आणि समाजात आरोग्याची जागरूकता वाढते.

जागतिक हृदय दिनानिमित्त भारतभर विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. वॉकथॉन, हृदय आरोग्य शिबिरे, व्यायाम कार्यशाळा, योगा शिबिरे आणि आरोग्य तपासणी शिबिरे या उपक्रमांमुळे लोकांमध्ये हृदयाचे महत्त्व समजते. वेगवेगळ्या शहरांमध्ये आयोजित वॉकथॉनमध्ये हजारो लोक सहभागी होतात, ज्यात कुटुंब, मित्र आणि विद्यार्थी सहभागी होऊन हृदय आरोग्याबाबत माहिती मिळवतात. वेगवेगळ्या शहरांमध्ये ङ्क्रश्चिशप ऋळीं चरीरींहेपफ आयोजित करून हृदय आरोग्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला जातो. या उपक्रमांमुळे समाजात आरोग्याबाबत जागरूकता वाढते, लोकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडतात आणि सामाजिक सहकार्य दृढ होते.

जागतिक हृदयदिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नाही, तर तो हृदयाच्या आरोग्यासाठी जागतिक चळवळ आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले तर, हा दिवस कुटुंबीय, समाज आणि व्यापक सामाजिक आरोग्य सुधारण्यासाठी एक संधी आहे. Don't Miss a Beat (एकही क्षण चुकवू नका) या थीमद्वारे लोकांना हृदयाच्या आरोग्याबद्दल जागरूकता, जीवनशैलीत सकारात्मक बदल आणि नियमित आरोग्य तपासणी करण्याची प्रेरणा मिळते. हृदयाचे आरोग्य राखणे म्हणजे केवळ वैयक्तिक कल्याण नाही, तर सामाजिक स्थैर्य आणि समाजातील आर्थिक व भावनिक संतुलन टिकवणे देखील आहे. चला, आपण सर्वजण एकत्र येऊन हृदयरोग प्रतिबंधासाठी प्रयत्न करूया, जेणेकरून आपले आणि आपल्या समाजाचे जीवन निरोगी, आनंदी आणि समृद्ध राहील.

-डॉ. राजेंद्र बगाटे,
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# जि.प. शाळेचा कायापालट : भिंती नव्हे, विद्यार्थ्यांचे भविष्य घडवूया!




गावाच्या वेशीवर उभी असलेली जिल्हा परिषदेची शाळा ही केवळ चार भिंतींची वास्तू नाही; ती त्या गावाच्या भविष्याची पहिली पायरी आहे. तिच्या अंगणात खेळणारी मुले म्हणजे उद्याचा समाज. तिच्या वर्गखोलीत उमटणारा प्रत्येक प्रश्न, प्रत्येक अक्षर आणि प्रत्येक स्वप्न हे भविष्यातील महाराष्ट्राची पायाभरणी करणारे असते. म्हणूनच जि.प. शाळेचा विकास म्हणजे केवळ शाळेची इमारत रंगविणे नव्हे, तर त्या शाळेतून घडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देणे होय.

आज महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या गुणवत्तावाढीसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. ङ्गचला शाळेत जाऊयाफ अभियानाच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वर्गखोल्या, वीज, क्रीडांगण, ई-सुविधा, पोषण आहार, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे सक्षमीकरण, लोकसहभाग आणि उडठ यांसारख्या बाबींवर भर दिला जात आहे. ही दिशा स्वागतार्ह आहे; मात्र या प्रयत्नांचा अंतिम केंद्रबिंदू ङ्गविद्यार्थीफ असला पाहिजे.सुंदर शाळा की सुंदर शिक्षण? शाळेच्या भिंती आकर्षक असाव्यात, वर्गखोल्या स्वच्छ असाव्यात, शौचालये आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा असावी, डिजिटल साधने उपलब्ध असावीतयाबाबत दुमत असण्याचे कारण नाही.पण एक मूल शाळेत येते तेव्हा त्याला सर्वप्रथम गरज असते ती समजून घेणाऱ्या शिक्षकाची, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य देणाऱ्या वातावरणाची आणि शिकण्याची आनंददायी प्रक्रिया निर्माण करणाऱ्या वर्गखोलीची. म्हणूनच शाळेच्या कायापालटाची व्याख्या बदलण्याची गरज आहे.ङ्गशाळा किती सुंदर दिसते?फ यापेक्षा

'शाळेतून मुले किती सुंदर शिकतात?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.वाचन करता न येणारा विद्यार्थी डिजिटल वर्गात बसला म्हणून डिजिटल शिक्षण पूर्ण होत नाही.गणितातील मूलभूत संकल्पना न समजलेल्या मुलाच्या हातात टॅबलेट दिला म्हणून गुणवत्तापूर्ण शिक्षण साध्य होत नाही. साधन महत्त्वाचे आहे; पण त्याहून महत्त्वाचा आहे त्याचा शैक्षणिक उपयोग.

जि. प. शाळेतील शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा आहे. मात्र अध्यापनाबरोबर विविध प्रशासकीय, ऑनलाइन व ऑफलाइन माहिती संकलनाची कामे शिक्षकांपर्यंत पोहोचत असतात. त्यामुळे शिक्षकाचा विद्यार्थ्यांसोबतचा प्रत्यक्ष शैक्षणिक वेळ कमी होण्याचा धोका असतो.अलीकडे प्राथमिक शिक्षण संचालनालयाने ङ्गमाहितीचा वार शनिवारफ या उपक्रमाद्वारे नियमित माहिती संकलनाचे काम शक्यतो शनिवारी करण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शिक्षकांना अध्यापनावर अधिक लक्ष केंद्रित करता येईल.हा विचार केवळ एका आदेशापुरता मर्यादित न राहता ङ्गशिक्षकाचा जास्तीत जास्त वेळ विद्यार्थ्यांसाठीफ या व्यापक धोरणात रूपांतरित झाला पाहिजे.कारण शिक्षक वर्गात असेल, तरच शिक्षण वर्गात घडेल.

ग्रामीण भागातील अनेक शाळांसाठी अजूनही पाणी, स्वच्छतागृह, वीज, वर्गखोली, फर्निचर, कुंपण, क्रीडांगण आणि डिजिटल साधने या मूलभूत बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून गुणवत्तेची चर्चा करता येणार नाही. परंतु सुविधांबरोबरच मुलांच्या मूलभूत शैक्षणिक क्षमतांवर तितकाच भर हवा.प्रत्येक मुलालासहज आणि अर्थपूर्ण वाचन करता आले पाहिजे.स्वतःचे विचार स्पष्टपणे लिहिता आले पाहिजेत.दैनंदिन जीवनातील गणित समजले पाहिजे.प्रश्न विचारण्याची सवय लागली पाहिजे.निरीक्षण, प्रयोग आणि तर्कशक्ती विकसित झाली पाहिजे.संविधानिक मूल्ये, समता, बंधुता आणि लोकशाहीची जाणीव निर्माण झाली पाहिजे.कला, क्रीडा आणि सर्जनशीलतेला संधी मिळाली पाहिजे.हीच खरी शैक्षणिक गुणवत्ता आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि इंटरनेटमुळे शिक्षणाची साधने वेगाने बदलत आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांनाही या नव्या जगापासून दूर ठेवता येणार नाही.मात्र ख किंवा डिजिटल साधने ही शिक्षकाची जागा घेण्यासाठी नव्हे, तर शिक्षकाची क्षमता वाढविण्यासाठी वापरली गेली पाहिजेत.पहिलीतील मुलाला ख शिकविण्यापूर्वी त्याला अक्षरांची, शब्दांची आणि कल्पनांची दुनिया समजून घेऊ द्या. प्राथमिक शिक्षणाच्या पायावरच तंत्रज्ञानाची भक्कम इमारत उभी राहू शकते.

जि.प. शाळा ही शासनाचीच नव्हे तर गावाचीही शाळा आहे.पालक, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी, स्थानिक उद्योजक, सामाजिक संस्था आणि गावातील सुशिक्षित नागरिक यांनी शाळेशी नाते जोडले पाहिजे.लोकसहभागातून एखादी वर्गखोली सुंदर होऊ शकते; उडठमधून डिजिटल साधने मिळू शकतात; माजी विद्यार्थी ग्रंथालय उभे करू शकतात. पण त्याहून मोठी गोष्ट म्हणजे गावाने आपल्या शाळेवर विश्वास ठेवणे.पालकांनीही आपल्या मुलांना केवळ ङ्गइंग्रजी माध्यमफ मिळावे म्हणून शाळा निवडण्याऐवजी त्या शाळेत शिक्षणाची गुणवत्ता,वातावरण आणि मुलांच्या विकासाच्या संधी यांचा विचार करणे आवश्यक आहे.

एका समर्पित शिक्षकाने संपूर्ण शाळेचे वातावरण बदलल्याची अनेक उदाहरणे ग्रामीण महाराष्ट्रात आहेत. यातला मी ही एक आहे.शिक्षकाने ठरवले तर वर्गखोली प्रयोगशाळा बनू शकते. शाळेचे अंगण क्रीडांगण बनू शकते. भिंत ज्ञानभिंत बनू शकते.पुस्तकांचे कपाट विद्यार्थ्यांच्या कल्पनांचे दालन बनू शकते.म्हणूनच जि.प. शाळेच्या परिवर्तनात शिक्षकाला केवळ अंमलबजावणी करणारा कर्मचारी न समजता परिवर्तनाचा प्रमुख भागीदार मानले पाहिजे.त्याला प्रशिक्षण, साधने, स्वातंत्र्य आणि विश्वास दिला पाहिजे.

नांदेडसारख्या ग्रामीण आणि सामाजिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण जिल्ह्यात जि.प. शाळांना मोठी ऐतिहासिक जबाबदारी आहे. अनेक कुटुंबांच्या पहिल्या पिढीला शिक्षणाची संधी या शाळांनी दिली आहे.आज परिस्थिती बदलली आहे. विद्यार्थ्यांच्या अपेक्षा बदलल्या आहेत. पालकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. तंत्रज्ञानाने शिक्षणाचे स्वरूप बदलले आहे.म्हणून जि.प. शाळांनीही बदलले पाहिजे. पण हा बदल फक्त रंगरंगोटीचा नसावा; तो विचारांचा असावा.फक्त डिजिटल बोर्ड नको-डिजिटल साक्षर विद्यार्थी हवा.फक्त सुंदर वर्ग नकोसुंदर विचार करणारा विद्यार्थी हवा.फक्त उपस्थिती नकोशिकण्याची उत्सुकता हवी.फक्त निकाल नकोजीवन जगण्याची क्षमता हवी.

जिल्हा परिषदेची शाळा ही गरीब, ग्रामीण किंवा वंचित मुलांसाठीची ङ्गपर्यायीफ शाळा नसून समान संधी देणारी लोकशाहीची शाळा आहे.या शाळेच्या भिंती मजबूत असाव्यात; पण त्याहून मजबूत असावा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास.वर्गखोल्या प्रकाशमान असाव्यात; पण त्याहून प्रकाशमान असावे विद्यार्थ्यांचे भविष्य.शाळेच्या अंगणात स्वच्छता असावी; पण त्याहून अधिक स्वच्छ असावा विचार.आणि सर्वांत महत्त्वाचे जि. प. शाळेचा कायापालट म्हणजे केवळ शाळेचा चेहरामोहरा बदलणे नव्हे; तर त्या शाळेतून घडणाऱ्या प्रत्येक मुलाच्या भविष्याचा चेहरामोहरा बदलणे होय. आज गरज आहे ती भिंती रंगविण्याबरोबरच स्वप्नांना रंग देण्याची, कारण सुंदर शाळा ही विकासाची सुरुवात आहे; पण सुंदर भविष्य घडविणारी शाळा हेच विकासाचे अंतिम ध्येय आहे!

-पंडित पवळे,
नांदेड
मो. ९८९०२३२९६२

# अन्नाची नासाडी : सामाजिक गुन्हा

अन्नाला आपल्या संस्कृतीत 'पूर्णब्रह्म' म्हटले जाते. अन्न हे केवळ जगण्यासाठीचे साधन नसून ते शेतकऱ्याच्या कष्टाचे, निसर्गाच्या देणगीचे आणि समाजाच्या सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक आहे. म्हणूनच अन्नाची नासाडी करणे म्हणजे केवळ एका पदार्थाची किंवा पैशाची नासाडी नव्हे, तर त्यामागे असलेल्या श्रमांचा आणि नैसर्गिक संसाधनांचा अपमान होय. त्यामुळे अन्नाचा अपव्यय रोखणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे.

२९ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अन्नाची नासाडी आणि अपव्ययाबाबत जनजागृती दिन म्हणून पाळला जातो. अन्नाची नासाडी कमी करणे, अन्नसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि उपलब्ध अन्नाचा योग्य वापर करण्याची सवय समाजात रुजवणे, हा या दिनामागील प्रमुख उद्देश आहे. जगभरात एकीकडे कोट्यवधी लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही, तर दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर अन्न वाया जाते, ही विसंगती निश्चितच चिंताजनक आहे.

भारतातही अन्नाच्या अपव्ययाचे प्रमाण मोठे आहे. घरगुती वापर, हॉटेल-रेस्टॉरंट, विवाह समारंभ, विविध सामाजिक कार्यक्रम, बुफे पद्धतीचे भोजन आणि किरकोळ विक्रीच्या साखळीत मोठ्या प्रमाणावर अन्न वाया जाते. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाने (UNEP) प्रसिद्ध केलेल्या अहवालांनीही भारतातील अन्नाच्या अपव्ययाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न केवळ अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यापुरता मर्यादित न ठेवता, उपलब्ध अन्न वाया जाऊ न देण्याशीही जोडला पाहिजे.



भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतकरी उन्हातान्हात राबतो, पाऊस, दुष्काळ, अवकाळी पाऊस, रोगराई आणि बाजारभावाच्या संकटांचा सामना करतो. शेतातून आपल्या ताटापर्यंत अन्न पोहोचण्यासाठी अनेक हातांचे कष्ट लागतात. अशा परिस्थितीत ताटात वाढलेले अन्न अर्धवट सोडून देणे किंवा उरलेले अन्न निष्काळजीपणे कचरापेटीत फेकून देणे योग्य नाही. एका बाजूला शेतकरी अन्न पिकविण्यासाठी संघर्ष करतो आणि दुसऱ्या बाजूला आपण सहजपणे अन्न फेकून देतो, ही विरोधाभासी परिस्थिती बदलली पाहिजे.

आपल्या घरातील ज्येष्ठ मंडळी नेहमी सांगायचीङ्गताटात घेतलेले अन्न वाया घालवू नका.फ ङ्गहवे तेवढेच वाढून घ्या आणि घेतलेले पूर्ण खाफ ही साधी शिकवण आजच्या पिढीने पुन्हा आत्मसात करण्याची गरज आहे. लग्नसमारंभ, वाढदिवस, सण-समारंभ आणि हॉटेलमधील भोजनावेळी गरजेपेक्षा अधिक पदार्थ ताटात घेण्याची सवय कमी झाली पाहिजे. 'अधिक म्हणजे चांगले' या मानसिकतेऐवजी 'आवश्यक तेवढेच' हा विचार रुजविला पाहिजे.

अन्नाची नासाडी ही केवळ आर्थिक बाब नाही; तिचा पर्यावरणावरही परिणाम होतो. अन्न तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी, जमीन, ऊर्जा, वाहतूक आणि मनुष्यबळ लागते. अन्न तयार करून ते खाल्लेच गेले नाही तर या सर्व संसाधनांचा अप्रत्यक्ष अपव्यय होतो. फेकून दिलेले अन्न कचऱ्यात सडताना पर्यावरणासाठी हानिकारक वायू निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अन्न वाचविणे म्हणजे केवळ अन्न वाचविणे नव्हे, तर पाणी, ऊर्जा, जमीन आणि पर्यावरणाचेही संरक्षण करणे होय.

अन्न वाया जाऊ नये यासाठी घरापासूनच सुरुवात करणे आवश्यक आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने गरजेपुरतेच अन्न वाढून घेणे, उरलेले अन्न योग्य पद्धतीने साठवणे, उपलब्ध अन्नाचा पुनर्वापर करणे आणि खराब होण्यापूर्वी त्याचा उपयोग करणे, या सवयी अंगीकारल्या पाहिजेत. हॉटेल आणि रेस्टॉरंटनीही ग्राहकांना आवश्यक तेवढेच अन्न घेण्यास प्रोत्साहन द्यावे. त्याचबरोबर कार्यक्रमांमध्ये उरलेले सुरक्षित आणि खाण्यायोग्य अन्न गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, हॉटेल व्यावसायिक आणि नागरिक यांच्या समन्वयातून व्यवस्था उभी करता येऊ शकते. अनेक ठिकाणी उरलेले अन्न गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे उपक्रम सुरू आहेत. अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्याची गरज आहे. 'कम्युनिटी किचन' किंवा सामुदायिक अन्नवाटप केंद्रांसारख्या संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविता येतील. मात्र गरजू व्यक्तींना अन्न देताना त्याची सुरक्षितता, स्वच्छता, साठवणूक आणि वेळेत वितरण यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. उरलेले कोणतेही अन्न सरसकट वाटण्याऐवजी केवळ सुरक्षित आणि खाण्यायोग्य अन्नच गरजूंपर्यंत पोहोचले पाहिजे. शाळा-महाविद्यालयांमध्येही अन्नाची किंमत आणि अन्नाच्या नासाडीचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली पाहिजे. 'ताटात अन्न शिल्लक ठेवणार नाही', 'गरजेपुरतेच वाढून घेईन', 'अन्नाचा आदर करीन' अशा छोट्या संकल्पांमधून मोठा सामाजिक बदल घडू शकतो.

अन्नाची नासाडी थांबविण्यासाठी केवळ कायदे किंवा सरकारी योजना पुरेशा नाहीत. त्यासाठी प्रत्येकाच्या मनात संवेदनशीलता निर्माण होणे आवश्यक आहे. अन्नाचा प्रत्येक कण शेतकऱ्याच्या कष्टाची आणि निसर्गाच्या देणगीची आठवण करून देतो. त्यामुळे अन्न फेकण्यापूर्वी एका क्षणासाठी त्या अन्नासाठी राबलेल्या शेतकऱ्याचा आणि ते अन्न मिळावे म्हणून संघर्ष करणाऱ्या भुकेल्या माणसाचा विचार केला पाहिजे.

अन्न वाचविणे म्हणजे भूक भागविणे; अन्नाची नासाडी थांबविणे म्हणजे समाजाची संवेदनशीलता जपणे. म्हणूनच अन्नाची नासाडी ही केवळ वैयक्तिक चुकीची सवय न मानता एक गंभीर सामाजिक प्रश्न म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. ङ्गअन्न हे पूर्णब्रह्मफ ही आपली संस्कृतीतील शिकवण केवळ बोलण्यात न राहता ती आपल्या आचरणात उतरली, तर अन्नाच्या अपव्ययाला मोठ्या प्रमाणात आळा घालता येईल. अन्नाची नासाडी थांबवूया, अन्नाचा आदर करूया आणि अन्न वाचवून भुकेल्यांच्या जीवनात आशेचा घास देऊया!

-श्याम ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वैरण व्यवस्थापनावर भर

## मौजे सायाळ येथे वैरण विकास योजनेची सीईओ महेश पाटील यांनी केली पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी वैरण उपलब्धता कायम ठेवण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याची गरज असून, उपलब्ध हिरवा व वाळलेला चारा तसेच कृषी पिकांचे अवशेष यांचा काटकसरीने व शास्त्रीय पद्धतीने वापर करण्यावर भर देण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी दिले.

लोहा तालुक्यातील सायाळ येथे पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या वैरण विकास योजनेची मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी २६ सप्टेंबर रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रगतीशील शेतकरी रत्नाकर ढगे यांच्या शेतास भेट देऊन योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या चारा लागवडीची पाहणी केली. तसेच त्यांच्या गोठ्यास भेट देऊन पशुधनाची



पाहणी केली व दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी करण्यात आलेल्या वैरण व्यवस्थापनाची माहिती घेतली.

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी वैरणीची उपलब्धता कमी होऊ नये, यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कडबाकुट्टी यंत्राचा वापर करून वैरणीची बचत करणे, निकृष्ट चाऱ्यावर योग्य प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविणे, बांधावर नेपियर गवताची लागवड करणे तसेच पशुपालकांमध्ये चारा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

उपलब्ध हिरव्या चाऱ्याचे योग्य पद्धतीने संवर्धन करून भविष्यातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी मुरघास निर्मिती व वापराला प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. पशुपालक शेतकऱ्यांमध्ये मुरघास निर्मितीबाबत जनजागृती करून उपलब्ध हिरव्या चाऱ्याचे जास्तीत जास्त संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

या पाहणीवेळी जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपआयुक्त डॉ. सखाराम खुणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय कळसाईत, उपविभागीय अधिकारी विलास नरोटे, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनिता वानखेडे, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांच्यासह पशुसंवर्धन, कृषी, महसूल, पाणीपुरवठा व इतर संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आजचा पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार महाकुंभ स्थगित

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाने औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक–२०२६ चा कार्यक्रम जाहीर केला असून, संबंधित निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला रोजगार महाकुंभ पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे.

रोजगार महाकुंभाची नवीन तारीख व वेळ निश्चित झाल्यानंतर संबंधित महाविद्यालये, उमेदवार व इतर संबंधितांना स्वतंत्रपणे कळविण्यात येणार आहे.

या अनुषंगाने सर्व संबंधित महाविद्यालयांनी रोजगार मेळाव्याच्या आयोजनासाठी करण्यात येणारी प्रसिद्धी, उमेदवारांची नोंदणी, उमेदवारांना उपस्थित राहण्याबाबतची कार्यवाही तसेच इतर सर्व तयारी पुढील आदेशापर्यंत तात्पुरती स्थगित ठेवावी.

रोजगार महाकुंभासाठी नोंदणी केलेल्या नोकरीइच्छुक उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नांदेड यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

# आ. श्रीजया चव्हाण यांच्याकडून बारड, डोंगरगाव परिसरात पिकांची पाहणी

**मुदखेड (प्रतिनिधी)–** भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी मुदखेड तालुक्यातील बारड–डोंगरगाव परिसराला भेट देऊन शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष जाऊन सोयाबीन आणि कापूस आदी पिकांची पाहणी करण्यात आली.

आमदार श्रीजया चव्हाण यांनी या पाहणी दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून पिकांची सद्यस्थिती, उत्पादनातील घसरण आणि नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण झालेल्या अडचणी जाणून घेतल्या.

बळीराजाच्या समस्यांवर सविस्तर चर्चा करत शेतात झालेल्या या संवादादरम्यान शेतकऱ्यांनी पावसाची अनिश्चितता, पिकांचे झालेले नुकसान आणि शेतीतील सततच्या घसरत्या उत्पादनाबाबत आपल्या व्यथा शेतकऱ्यांनी आमदार श्रीजया चव्हाण पुढे मांडल्या. आमदार श्रीजया चव्हाण यांनी सर्व समस्या अतिशय गांभीर्याने ऐकून घेतल्या. तसेच शेतकऱ्यांचे हे प्रश्न राज्य शासनाच्या निदर्शनास आणून



देऊन त्यांना योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर प्रशासकीय पाठपुरावा करण्याचे ठोस आश्वासन दिले.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड आणि मुदखेड हे तालुके दुष्काळग्रस्त यादीतून वगळण्यात आल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष व चिंतेचे वातावरण आहे. या विषयावरही यावेळी सविस्तर चर्चा झाली. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून या दोन्ही तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश व्हावा आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ठाम भूमिका आमदार श्रीजया चव्हाण यांनी मांडली.

या पाहणी दौऱ्यादरम्यान बँकेचे माजी संचालक गोविंदराव नागेलीकर, भाजपा नांदेड जिल्हा उत्तर सरचिटणीस बाळासाहेब देशमुख बारडकर, तहसीलदार आनंद देवूळगावकर, गटविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह उद्धवराव पवार, दत्तू देशमुख, जी. एस. सय्यद, राम गवंडेवाड, सुभाष धबडगे, कामाजी पवार, लक्ष्मणराव जाधव यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बावरीनगरमध्ये भाद्रपद पौर्णिमा उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाविहार बावरीनगर, दाभड येथे भाद्रपद पौर्णिमेनिमित्त आयोजित विशेष धम्म कार्यक्रम हजारो उपासक–उपासिकांच्या उपस्थितीत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पू. भिक्खु प्रा. डॉ. एम. सत्यपाल महाथेरो होते. यावेळी पू. भिक्खु विनयबोधी प्रिय महाथेरो व पू. भिक्खु रेवतबोधी थेरो यांनी धम्मदेशना दिली. भगवान बुद्धांच्या प्रज्ञा, करुणा, मैत्री, समता व शील या जीवनमूल्यांवर त्यांनी प्रकाश टाकला. आजच्या धावपळीच्या जीवनात मनाचे निरीक्षण, ध्यानसाधना व सदाचाराचे महत्त्व विशद करून धम्माचे केवळ श्रवण न करता आचरण करण्याचे आवाहन केले.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले नववी इयत्तेतील विद्यार्थ्यांचा श्रामणेर दीक्षा स्वीकार. भिक्खु संघाच्या उपस्थितीत पार पडलेल्या या विधीने उपस्थितांमध्ये प्रेरणा निर्माण केली. हजारो उपासकांनी नवदीक्षित श्रामणेरास मंगल शुभेच्छा दिल्या.

## बोलण्यापेक्षा कृतीतून समाजसेवा अधिक प्रभावी –एडीजी डॉ. रवींद्रकुमार सिंगल

**नांदेड (प्रतिनिधी)–** समाजसेवेची खरी ताकद केवळ विचार मांडण्यात किंवा त्याविषयी बोलण्यात नसून, त्या विचारांचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर करण्यात आहे. समाजासाठी सातत्याने आणि निःस्वार्थ भावनेने केलेले कार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरते, असे प्रतिपादन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी केले.

नांदेड येथे तत्कालीन पोलीस अधीक्षक असताना त्यांनी सन २००७ मध्ये भरती केलेल्या अंमलदारांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान व वृक्षारोपण पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात आयोजित कार्यक्रमात ते रविवार दि. २७ सप्टेंबर रोजी बोलत होते.

यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, एसीबीचे



पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, एसीबीच्या डॉ. अश्विनी जगताप, मुख्यालयाचे डीवायएसपी सुनील माने आणि रोटरी क्लबचे सुरेश आंबुलगेकर यांचे उपस्थिती होती.

पुढे बोलताना सिंगल म्हणाले की, गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येत असलेल्या वृक्षारोपण आणि रक्तदान उपक्रमाचे विशेष कौतुक केले. सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने सुरू असलेले हे कार्य पाहून मनाला आनंद झाल्याचे त्यांनी नमूद केले. पोलीस सेवेसोबतच सामाजिक सेवा करणे हे मोठे काम असून ते आपण सर्वांनी टिकवून ठेवले. यापुढेही असेच काम करत राहा, अशा शुभेच्छा सिंगल यांनी दिल्या.

यावेळी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्या भाषणात सांगितले की, कर्तव्य कठोर खात्यात काम करताना मानसिक आणि शारीरिक बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पोलीस सेवेत काम करताना आत्मिक समाधान तर मिळतेच, परंतु शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्यासह श्रीकृष्ण कोकाटे आणि आयुक्त डोईफोडे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रशासन व पोलीस विभागातील विविध अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

यानंतर रक्तदान शिबिरामध्ये सहभागी झालेल्या पोलीस अंमलदार, अधिकारी व अन्य रक्तदात्यांना स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवीण्यात आले. त्यानंतर जिल्हा शांतता कमिटीचे सदस्य ॲड. कासिम बाबू वसीम शेठ यांच्या संपर्क कार्यालयाला भेट दिल्यानंतर एडीजी सिंगल आणि उमाप यांचा सत्कार करण्यात आला.

# गणपती अथर्वशीर्ष पठण सेवा उपक्रम उत्साहात

**किनवट (प्रतिनिधी)** –बाल संस्कार व युवा प्रबोधन विभाग श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र, एस व्ही एम परिसर (किनवट, गोकुंदा, रामनगर, सुभाषनगर येथे परमपूज्य मोरेदादा यांच्या आशीर्वादाने गुरुपुत्र नितीन यांच्या मार्गदर्शनाखाली एक कोटी गणपती अथर्वशीर्ष पठण सेवा उपक्रम उत्साहात व भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



दि. १४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत सर्व बालसंस्कार प्रतिनिधी, विद्यार्थी, सेवाधारी आणि बालसंस्कार वर्गातील मुलांनी एकत्र येऊन ही सेवा श्री स्वामी समर्थ महाराजांच्या आणि श्री गणरायाच्या चरणी अर्पण केली. सदर सेवा ही सामूहिक, वैयक्तिक, ऑनलाईन स्वरूपात तसेच परिसरातील विविध सार्वजनिक गणेश मंडळे, वसतिगृह, कोचिंग क्लासेस तसेच सरस्वती विद्या मंदिर, गुरुकुल, रतनीबाई राठोड शाळा, सुमतीबाई राठोड शाळा, बिरसा मुंडा शाळा, शांतिनिकेतन, साई श्रीनिवासा, इंदिरा गांधी शाळा, कन्यका परमेश्वरी, स्वामी विवेकानंद टेक्नो स्कूल, शिशुवाटिका, आश्रम शाळा मांडवा, नागझरी जिल्हा परिषद शाळा, कमठाला जिल्हा परिषद शाळा, बोरगाव जिल्हा परिषद शाळा, यशवंत अकॅडमी, पाटील अकॅडमी, माय मराठी अकॅडमी, जगदंबा क्लासेस, बालाजी अकॅडमी, इन्फिनिटी क्लासेस परिसरातील सर्व प्रमुख सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात ही सेवा पूर्ण करण्यात आली.

# अनंत चतुर्दशीनिमित्ताने हॉटेल छत्रपती सिडकोचा अनोखा कार्यक्रम उत्साहात साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** अनंत चतुर्दशी निमित्ताने गेल्या चार वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जोपासत सिडको परिसरातील हॉटेल छत्रपतीच्या वतीने याही वर्षी अनंत चतुर्दशी निमित्ताने हभप पंडित पाटील पळसगावकर महाराज यांच्या भजन सोहळ्यास भाविक भक्तांसाठी व श्री विसर्जन मिरवणुकीत सहभागी भक्तांसाठी २५ सप्टेंबर रोजी मोफत चहा वाटपास परिसरातील हजारो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

लोंढे पाटील यांच्या हॉटेल छत्रपती सिडको, क्षणभर विश्रांती, पोटभर तृप्तीतर्फे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशी निमित्त मोफत चहा वाटप आणि द.भ.प. पंडित पाटील पळसगावकर महाराज यांचा भजन सोहळा २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता आयोजित केला होता. प्रसिद्ध उद्योजक तथा भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी कपाळे, नांदेड दक्षिणचे शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, नगरसेवक संजय पाटील घोगरे, प्रतिनिधी उदय देशमुख, सतीश पाटील बस्वदे, राजू लांडगे, पप्पू गायकवाड यांच्यासह पत्रकार, सामाजिक, राजकीय कार्यकर्ते व भाविक भक्त उपस्थित होते.

## किनवट येथे मोफत आरोग्य, शस्त्रक्रिया महाशिबिराचे आयोजन

**किनवट (प्रतिनिधी)–** श्री साईकृपा विश्वस्त मंडळ किनवटच्यावतीने दि. १ ऑक्टोबर रोजी मोफत आरोग्य तपासणी व शस्त्रक्रिया महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर किनवट येथील श्री नर्मदेश्वर महादेव बारा ज्योतिर्लिंग साईबाबा मंदिर प्रांगणात पार पडणार आहे.

या महाशिबिरामध्ये परिसरातील गरजू रुग्णांसाठी विविध आरोग्य सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी व रुग्णांनी या मोफत महाशिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक. साईकृपा विश्वस्त मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहिती व नोंदणीसाठी आयोजक पवार गुरु स्वामी यांच्याशी ९८५०६३१९९१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

# सेवानिवृत्तीच्या अवघ्या दोन दिवस आधी मुख्याध्यापक मनोहर गायकवाड अखेर निलंबित

**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मुगाव तांडा केंद्र गडगा येथील मुख्याध्यापक मनोहर भुजंगराव गायकवाड यांच्यावर अखेर जिल्हा परिषद नांदेड प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली आहे. सेवानिवृत्तीच्या अवघ्या दोन दिवस आधी ही कारवाई झाल्याने परिसरात मोठी चर्चा सुरू असून, अनेक महिन्यांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुख्याध्यापक मनोहर गायकवाड यांच्याविरोधात विविध अनियमितता व गैरवर्तनासंदर्भात तक्रारी करण्यात आल्या होत्या. या प्रकरणी चौकशी, कारणे दाखवा नोटीस आणि संबंधित कागदपत्रांच्या आधारे प्रशासनाने पुढील कार्यवाही केली आहे. अखेर निलंबनाचा आदेश निर्गमित झाल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

या प्रकरणात संबंधितांवर कारवाई व्हावी यासाठी गावकऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या संघर्षात विविध स्तरांवर निवेदने देऊन प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले होते. तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, ही गावकऱ्यांची प्रमुख मागणी होती.

निलंबनाच्या कारवाईनंतर गावकऱ्यांनी आनंद व्यक्त करत प्रशासनाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. अनेकांवर अन्याय झाल्याची भावना व्यक्त करणाऱ्या ग्रामस्थांना या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे. अन्यायाविरुद्ध एकजुटीने आवाज उठविल्यास न्यायासाठीचा संघर्ष यशस्वी होऊ शकतो, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या प्रकरणातील मनोहर भुजंगराव गायकवाड हे अनेक गोरगरीब लोकांवर अन्याय केल्याचे सांगितले जात होते. त्यांच्याविरुद्ध अनेक तक्रारी समोर आल्या होत्या. यामुळे पुढील विभागीय चौकशी नियमानुसार पूर्ण करून अंतिम निर्णय घ्यावा आणि संबंधित प्रकरणातील सर्व बाबींची निष्पक्ष तपासणी करावी, अशी मागणीही गावकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## किनवटमध्ये १ लाख रूपयांचा गुटखा जप्त

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट तालुक्यातील राजगड येथे बेकायदेशीररित्या साठा करून ठेवलेला १ लाख रुपयांचा गुटखा व सुगंधित तंबाखू पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी किराणा दुकानदार खुशाल अंबरसिंग राठोड याच्याविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

राजगड येथील रहिवासी खुशाल राठोड याने स्वतःच्या आर्थिक लाभासाठी विनापरवाना व बेकायदेशीरपणे विविध कंपन्यांचा गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखू आपल्या राहत्या घरी साठवून ठेवला होता. याबाबत मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी शनिवार, दि. २६ सदर ठिकाणी छापा टाकून मुद्देमाल जप्त केला.

# पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी नांदेड प्रशासन सज्ज

## आचारसंहितेचे काटेकोर पालन करा –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड (जिमाका)–** महाराष्ट्र विधान परिषदेच्या ५–औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्हा प्रशासनाने निवडणूक तयारीला वेग दिला आहे. निवडणुकीचे कामकाज वेळेत व सुरळीत पार पाडण्यासाठी विविध कक्ष स्थापन करून जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संबंधित अधिकारी–कर्मचाऱ्यांना आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना त्यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली ५–औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या



द्वैवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेमण्यात आलेल्या समितीचे नोडल अधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिकारी, कर्मचारी यांची आढावा बैठक घेऊन सूचना देण्यात आली. यावेळी अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने, सर्व उपविभागीय अधिकारी, नोडल अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचारी उपस्थित होते.

निवडणुकीसाठी नामनिर्देशन व मतदार यादी, आचारसंहिता, कायदा व सुव्यवस्था, प्रशिक्षण, मतपत्रिका तपासणी व वितरण, स्वीप व मतदार सुविधा, वाहन व वाहतूक व्यवस्था, मतदान कर्मचारी व्यवस्थापन, टपाली मतपत्रिका, आयटी व पोल डे रिपोर्टिंग, स्ट्राँग रूम व मतमोजणी, अवैध दारू वाहतूक प्रतिबंध, निवडणूक खर्च देखरेख, माध्यम नियंत्रण तसेच मतदार मदत व तक्रार निवारण अशा विविध कक्षांची स्थापना करण्यात आली आहे.

मतदारांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांना मदत करणे, मतदान केंद्रांवर आवश्यक मनुष्यबळ व साहित्य उपलब्ध ठेवणे, मतदानानंतर मतपेट्या सुरक्षितपणे स्ट्राँग रूममध्ये जमा करणे, तसेच सीसीटीव्ही व सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

निवडणूक खर्चावर देखरेख ठेवून उमेदवार व राजकीय पक्षांच्या खर्चाची नोंद घेणे, माध्यमांमधील निवडणूकविषयक बातम्यांचे संनियंत्रण करणे आणि मतदारांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्याची जबाबदारीही संबंधित कक्षांकडे सोपविण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व अधिकारी–कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी दक्षतेने पार पाडावी.

कोणत्याही प्रकारे आचार–संहितेचा भंग होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी, असे जिल्हाधिकारी कर्डिले यांनी स्पष्ट केले.

# उस्मानशाही मीलचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करु –खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** उस्मानशाही मीलचे पुनरुज्जीवन करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजे, असे प्रतिपादन खासदार रवींद्र चव्हाण यांनी केले.

उस्मानशाही मील संवर्धन समितीच्या वतीने नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे बोलावण्यात आलेल्या सर्वपक्षीय बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. उस्मानशाही मील सुरू झाल्यावर नांदेडला पुन्हा वैभव प्राप्त होईल, त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती व लोकांचे पाठबळ असणे गरजेचे आहे. त्यासाठी संघटित प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला,



असे खा. चव्हाण म्हणाले.

यावेळी उस्मानशाही मील संवर्धन समितीचे श्याम निलंगेकर, बळवंत मोरे, प्रवीण जेठेवाड, शकीला मॅडम, रवींद्र मोदी, ॲड. शिवराज कोळीकर, ॲड. सचिन मगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या बैठकीला सी.पी.आय. चे सचिव प्रदीप नागपूरकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा इंजि. प्रांजली रावणगावकर, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रा. राज अटकोरे, रोहन कहाळेकर, कावेरी ढगे, सुभाष लोखंडे, जनता दलाचे डॉ. किरण चिद्रावार, समाजवादी पार्टीचे आयुबखान पठाण, शिवसेनेचे सचिन पाटील, मोईज खान, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड. जमीर पठाण, काँग्रेसच्या नेत्या डॉ. रेखा चव्हाण, ॲड. सुरेंद्र घोडजकर, भीम प्रहारचे जिल्हाध्यक्ष दीपक पवळे, मनप्रीतसिंग पुजारी, बलमित्रसिंग चावला, कॉ. भगवान नाईक, राजेंद्रकुमार तुडमे, जमिलोद्दीन सिद्दीकी, अमीन शुक्ला, भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष किरण सदावर्ते, स्वप्नील भोसीकर, खोब्राजी निखाते, प्रकाश चितळकर, काजी जमलोद्दीन, कॉ. मीना आरसे, कॉ. जयराज गायकवाड, गोविंदसिंग भोसीवाले, मंगेश वट्टेवाड, विनायक कामठेकर यांच्यासह अनेक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक, संचालन व आभार प्रदर्शन श्याम निलंगेकर यांनी केले.


स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# वरुणराजाची हुलकावणी अन् बळीराजावर संकट!

» पावसाच्या 30-40 दिवसांच्या भीषण खंडाने पिकं कोमेजली;
» संकट काळात शेती वाचवण्याचा मास्टरप्लॅन जाणून घेऊ...

**आस्मानी संकट काही बळीराजाची पाठ सोडायला तयार नाही! पावसाने तब्बल ३० ते ४० दिवस मारलेली ताण अन् ओढलेली दांडी... परिणामी तापमानाचा पारा चढला आणि शेतातली पिके पाण्याच्या अन् उष्णतेच्या तीव्र ताणाखाली होरपळून निघाली. पानांची लवचिकता गायब, पानं वळलेली, कोमेजलेली, फुलांची आणि बोंडांची गळती... शिवारात चोहीकडे फक्त चिंतेचं सावट! आता कुठे परतीचा वा थेंबभर पाऊस पडला म्हणून 'सगळं काही आलबेल झालं' अशा भ्रमात राहू नका! पाऊस पडून गेला तरी पिकाचा ताण काही एका रात्रीत पळून जात नाही. त्यामुळे आता हवेत गप्पा मारण्यापेक्षा जमिनीवर उतरून ओलावा टिकवण्याचा आणि पिकाला पुन्हा उभं करण्याचा रोखठोक कार्यक्रम आखावाच लागेल.**



## जमिनीत पाणी मुरवा, तणांना उखडून फेका!

पावसाचा थेंब न् थेंब जमिनीत जिरवणं हाच सध्याचा एकमेव धर्म असायला हवा. जमीन वाफसा स्थितीवर येताच आंतरमशागत करा, जेणेकरून बाष्पीभवण थांबेल. सर्वात महत्त्वाचं म्हणजे तणांचा बंदोबस्त करा! ही तणं म्हणजे पिकाच्या हक्काच्या ओलाव्यावर दरोडा टाकणारे दरोडेखोरच आहेत. शेत साफ आणि तणमुक्त ठेवा, तरच जमिनीत ओलावा टिकेल.

## फवारणीची घाई नको; पिकाचा अंदाज घ्या!

पावसानंतर शेत जरा हिरवं दिसू लागलं म्हणून लगेच औषधांचे डोस पाजायला धावू नका. मुळांची भूक पूर्ववत व्हायला वेळ लागतो. १० मिमीपेक्षा कमी पाऊस असेल तर पिकाचा ताण कायम असतो. अशा वेळी १ टक्का पोटॅशियम नायट्रेट (13:0:45) म्हणजेच १० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा. (दोन फवारण्यांमध्ये १० दिवसांचं अंतर असलंच पाहिजे!) कोमेजलेल्या पिकांवर लगेच फवारणीचा प्रयोग करू नका. ऊन कमी झाल्यावर आणि पानं तजेलदार झाल्यावरच औषध टाका. ६० ते ७० मिमी चांगला पाऊस झाला असेल तर 13:0:45ची फवारणी करण्याची अजिबात गरज नाही! परिस्थितीनुसार 19:19:19या विद्राव्य खताची ०.५ ते १ टक्का फवारणी पुरेशी ठरते.



## सोयाबीन, कापूस आणि तूर तातडीने सावरा!

» सोयाबीन : सध्या सोयाबीन फुलोऱ्यात आणि शेंगा भरण्याच्या नाजूक टप्प्यावर आहे. जमिनीत ओलावा टिकवणं आणि गरजेनुसारच फवारणी करणं हेच सोयाबीनला वाचवेल.

» कपाशी : पावसाच्या खंडाने बोंडं अन् फुलं गळली असतील तर परिस्थिती पाहून २ टक्के युरिया, १ टक्का 13:0:45किंवा संतुलित विद्राव्य खतांचा डोस द्या.

» तूर : तुरीच्या वाढीसाठी जमिनीतील ओलावा जपणे हाच एकमेव मार्ग आहे.

## सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि बायो-स्टिम्युलंट्सचा 'स्मार्ट' वापर

दीर्घकाळ पाणी न मिळाल्यामुळे मुळं आळशी होतात आणि जस्त, लोह, बोरॉन शोषून घेऊ शकत नाहीत. पण आठवणीने ऐका, सगळी सूक्ष्म अन्नद्रव्ये एकत्र करून फवारणी करू नका! ज्याची कमतरता दिसेल, त्याचीच स्वतंत्र फवारणी करा. तसेच, अमिनो ॲसिड, ह्युमिक ॲसिड किंवा समुद्री शेवाळ अर्क हे केवळ 'पूरक' आहेत, ते पाण्याला पर्याय ठरू शकत नाहीत!

## कीड-रोगांच्या आक्रमणावर कडक नजर ठेवा!

ढगाळ वातावरण आणि आर्द्रता वाढल्याने मावा, तुडतुडे, पांढरी माशी, कोळी, शेंगा पोखरणाऱ्या अळ्या आणि बुरशी डोके वर काढतील. पण भीतीपोटी औषधांचा मारा करू नका! किडींची आर्थिक नुकसानीची पातळी ओळखा. रसशोषक किडी पावसामुळे आधीच कमी झाल्या असतील तर नको त्या फवारण्या करून खिशाला कात्री लावू नका.

## तज्ज्ञांचा थेट अन् स्पष्ट इशारा!

'पावसाचा खंड पडला म्हणून युरिया, 19:19:19, 13:0:45, सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि कीटकनाशके एकत्र करून पिकावर मारण्याचा खटाटोप करू नका. ताणग्रस्त पानांवर जास्त क्षारता असलेल्या द्रावणामुळे पानं करपून राख होतील! पाऊस पडला म्हणजे संकट टळलं असं अजिबात नाही. ओलावा जपणे, तण नियंत्रण आणि गरजेनुसारच मोजकी फवारणी करणे हाच या संकटातून बाहेर पडण्याचा खरा मार्ग आहे!

# चाराटंचाईचे महासंकट

## गावपातळीवरील नियोजनाचा अन् जनावरे वाचवण्याचा आराखडा!



**वरुणराजाने ओढ दिली अन् पिकांबरोबरच आता जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही पेटला आहे! आस्मानी संकटाची सावली थेट गोठ्यांपर्यंत पोहोचली असून, आगामी काळात भीषण चाराटंचाईची टांगती तलवार बळीराजावर लटकतेय. पण आता हातवर करून रडत बसण्यात काहीच अर्थ नाही! उपलब्ध हिरवा चारा, कडबा, पिकांचे अवशेष अन् वाळलेला चारा यांचं योग्य गणित मांडून या संकटाचा सामना करावाच लागेल!**

## गावातली यंत्रणा एकत्र करा; सामूहिक लढाई उभी करा!

» चाराटंचाईवर मात करायची असेल तर प्रत्येकाने वैयक्तिक चुली पेटवून चालणार नाही. गावपातळीवर सगळ्या संसाधनांची एकजूट करावीच लागेल!

» संसाधनांची मोजदाद करा : गावातील विहिरी, बोअरवेल, शेततळी, पाइपलाइन, कुट्टी मशीन आणि वाहतूक साधनांचा सामूहिक आराखडा तयार करा.

» एकत्र या अन् नियोजन करा : शेतकरी, ग्रामपंचायत, कृषी-जलसंधारण-पशुसंवर्धन विभाग, दूध संस्था अन् बचत गटांनी कागदी घोडे नाचवण्याऐवजी एकत्र येऊन कृती आराखडा बनवावा. उपलब्ध पाण्याचा थेंब अन् चाऱ्याची काडी वाचवण्यासाठी हाच एक रोखठोक मार्ग आहे!

» रब्बीचं नियोजन आताच करा; कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य!

» खरीप हाताचा गेला म्हणून हातपाय गाळून चालणार नाही. जमिनीतील ओलावा टिकवून रब्बीची तयारी आतापासूनच सुरू करा.

» कमी पाण्याच्या पिकांवर भर द्या : जमिनीचा वाफसा आणि उपलब्ध ओलावा पाहून जवस, करडई, हरभरा आणि रब्बी ज्वारी सारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना पसंती द्या.

» हवामानाचा अंदाज घ्या : पेरणीची घाई न करता स्थानिक हवामान सल्ला आणि ओलावा पाहूनच पेरणीची वेळ ठरवा. शेतातील ओलावा टिकवण्यासाठी मृदा व जलसंधारणाचे उपाय तातडीने करा.

## जनावरांचा आहार सुधारा; कडधान्यवर्गीय चाऱ्याचा डोस द्या!



» फक्त ज्वारी, मका किंवा बाजरीचा वाळलेला कडबा पोटात ढकलून जनावरांचे पोषण होणार नाही.

» चाऱ्यात लुसर्न, बरसीम, चवळी किंवा गवार यांसारख्या कडधान्यवर्गीय चाऱ्याची भेसळ करा. यात प्रथिनांचे (Proteins) प्रमाण अधिक असल्याने जनावरांची ताकद टिकून राहील.

» विशेषतः दूध देणाऱ्या जनावरांसाठी स्वच्छ पाणी, संतुलित पशुखाद्य आणि पशुवैद्यकांच्या सल्ल्याने खनिज मिश्रणाचा (Mineral Mixture) वापर सुरू करा.

## कडब्यावर युरियाची प्रक्रिया : समजून करा, नसेल जमणार तर हात लावू नका!

» निकृष्ट दर्जाच्या वाळलेल्या कडब्याची पौष्टिकता वाढवण्यासाठी २ ते ४ टक्के युरिया प्रक्रिया हा उत्तम उपाय आहे.

» कशी कराल प्रक्रिया? : १०० किलो कोरड्या कडब्यासाठी ४ किलो युरिया आणि ५० लिटर पाणी एकत्र करून कडब्यावर शिंपडा. तो दाबून हवाबंद करून ठेवा.

» सर्वात मोठी सावधानता : २१ दिवसांनंतर हा कडबा उघडल्यावर लगेच जनावरांपुढे टाकू नका! त्याला आधी उघड्या हवेत ठेवा, जेणेकरून विषारी अमोनिया वायू निघून जाईल.

» इशारा: युरिया हे थेट जनावरांना खायला घालायचे औषध नाही! यात चुकलात तर जनावरं दगावण्याचा (विषबाधेचा) मोठा धोका असतो. त्यामुळे तज्ज्ञांच्या देखरेखीखालीच हे करा. सोपा मार्ग हवा असेल तर १ ते ४ टक्के मीठ आणि गुळाच्या पाण्याचा प्रयोग करून चाऱ्याची चव आणि पौष्टिकता वाढवा!

## चाऱ्याची 'सुरक्षा भिंत' उभी करा!

» कुट्टी करून साठवणूक : सोयाबीन, ज्वारी, बाजरी, मका, तुरीच्या अवशेषांचे कुट्टीकरण करून सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवा.

» बुरशीलेला चारा फेकून द्या : कडबा जमिनीच्या थेट संपर्कात येणार नाही आणि पावसाने भिजणार नाही अशा हवेशीर जागी ठेवा. ओलसर अन् बुरशी आलेला चारा जनावरांना देऊन रोगांना आमंत्रण देऊ नका.

## मुरघास (Silage) बनवा, हाच खरा संजीवनी उपाय!



सध्या उपलब्ध असलेल्या हिरव्या मका किंवा ज्वारीपासून मुरघास बनवून हवाबंद खड्ड्यांत साठवा. ऐन टंचाईच्या काळात हाच मुरघास जनावरांचे प्राण वाचवेल! वैयक्तिक शक्य नसेल तर बचत गट किंवा शेतकरी कंपन्यांनी 'सामूहिक मुरघास केंद्र' सुरू करून लहान शेतकऱ्यांना दिलासा द्यावा!

# पाण्याचे थेंब न् थेंब वाचवून पीक जगवा!

## कोरड्या दुष्काळाच्या सावटात शेतातील पाण्याचे रोखठोक अन् स्मार्ट व्यवस्थापन!

**आकाशात ढगांची दाटी होते, पण पावसाचा थेंबही न सांडता ढग पसार होतात! पावसाच्या लांबलेल्या खंडाने शेतातील पिके पाण्याची वाट पाहत तहानलेली आहेत. अशा संकट काळात उपलब्ध पाण्याचा गैरवापर करणे म्हणजे सरळ सरळ पायावर धोंडा मारून घेण्यासारखा प्रकार आहे. सगळ्या शेताला एकदमच पाणी पाजतो या आवेशात राहिलात, तर पदरी फक्त निराशाच पडेल! म्हणूनच, आता जमिनीतील पाण्याचा थेंब न् थेंब जपण्यासाठी रणनीती आखायला सुरुवात करा!**

### हवामानाचा अंदाज अन् गावातील सामूहिक ताकद!

» हवामानाची अपडेट ठेवा : उद्या पाऊस पडणार असेल आणि आजच तुम्ही सिंचन केले, तर पाण्याचा अपव्यय होईल. हवामान अंदाजावर लक्ष ठेवूनच सिंचनाचे नियोजन करा.


» पाण्याचे सामूहिक वेळापत्रकः गावातल्या विहिरी, बोअरवेल, शेततळी, पाईपलाईन अन् मोटारपंप यांचा सामूहिक वापर करा. ग्रामस्तरीय समिती किंवा शेतकरी गट स्थापन करून कोणाच्या शेताला, कधी आणि किती पाणी द्यायचे याचे कडक वेळापत्रक आखा!

### संपूर्ण शेताला उधळपट्टी नको; संवेदनशील टप्प्यांवरच पाणी द्या!

» पाण्याची कमतरता असताना सगळ्या पिकांना एकत्र धुवून काढण्याची चूक करू नका. पिकाच्या आयुष्यात काही नाजूक टप्पे असतात, तिथेच पाण्याची सर्वाधिक गरज असते.

» प्राधान्य ठरवाः फुलोरा, शेंगा किंवा बोंडधारणा आणि दाणे भरण्याचा काळ - या पिकाच्या अत्यंत संवेदनशील अवस्था आहेत. या टप्प्यांवर पिकाला संरक्षित सिंचन आधी द्या.

» हप्ते पाडून पाणी द्या : एकाच वेळी पाण्याचा पूर आणण्यापेक्षा पिकाच्या गरजेनुसार आवश्यक तेवढेच पाणी टप्प्याटप्प्याने द्या. यामुळे कमी पाण्यात जास्त क्षेत्रातील पीक सुरक्षित राहील.



### ठिबक आणि तुषारचा वापर करा; नसेल तर 'एक आड एक सरी' वापरा!

» पारंपरिक पद्धतीने पाणी सोडून पाण्याचा अपव्यय करण्याची ही वेळ नाही.

» टार्गेटेड सिंचनः ठिबक (Drip) किंवा तुषार (Sprinkler) सिंचनाचा वापर करा, ज्यामुळे पाणी थेट पिकाच्या मुळांपर्यंत पोहोचेल आणि बाष्पीभवन टळेल.

» देशी अन् सोपा जुगाडः ठिबक-तुषार संच उपलब्ध नसेल, तर एक आड एक सरी (Alternate Furrow) पद्धतीने पाणी द्या. यामुळे ५० टक्के पाण्याची बचत होते अन् पीकही वाचते!

### जमिनीतील ओलावा टिकवा; भेगा बुजवून टाका!

» फक्त पाणी देणे महत्त्वाचे नाही, तर ते जमिनीत टिकवून ठेवणे हा खरा पराक्रम आहे.

» आच्छादन (Mulching) कराः पिकांचे अवशेष, वाळलेले गवत जमिनीवर पसरवून आच्छादन करा.

» कोळपणी अन् भर द्याः हलकी आंतरमशागत किंवा कोळपणी करून जमिनीला पडलेल्या भेगा तातडीने बुजवून टाका, जेणेकरून जमिनीतील ओलावा वाफेच्या रूपात उडून जाणार नाही.

### शेततळ्यातील पाण्याचा मास्टर प्लॅन करा!

» शेततळ्यात पाणी आहे म्हणून एकाच पिकावर ते उधळू नका!

» शेततळ्यातील साठा, पिकाची अवस्था आणि पुढील पावसाचा अंदाज घेऊनच पाण्याचा थेंब अन् थेंब मोजून-मापून वापरा.

» शेततळ्याच्या इनलेट-आऊटलेटची दुरुस्ती करा आणि पाणी गळती (Seepage) रोखण्यासाठी तातडीने तपासणी करा.

# पावसाच्या खंड काळात फळबागेचे व्यवस्थापन

**पावसान ओढ दिल्यामुळे खरीप पिकासोबतच फळपिकांनाही झळ बसतेय. फळाबागेला पाण्यात ताण बसल्यामुळे काय परिणाम होतो आणि अशावेळी डाळिंब, मोसंबी, संत्रा, केळी, सीताफळ आणि अंजीर बागेत कोणते उपाय करायचे याची तज्ज्ञांनी दिलेली माहिती पाहूया...**

डाळिंबाची मृग बहराची बाग सध्या फळ 'सेटिंग'च्या अवस्थेत आहे. या बागांना संरक्षित पाणी द्यावे. याशिवाय आच्छादनही करून बाष्परोधकाची फवारणी करावी. पाण्याच्या ताणामुळे वाढीच्या अवस्थेतील बागांमधील फळांचा आकार लहान झाला आहे. काही ठिकाणी फळगळ, फूलगळ दिसत आहे. या ठिकाणी फळांची विरळणी करा. बऱ्याचशा मोसंबी लागवड क्षेत्रात पुरेसा पाऊस झालेला नाही. त्यामुळे झाडाच्या मुळांजवळील तापमानात वाढ झाल्यामुळे फळगळ दिसून येत आहे. फळगळ नियंत्रणासाठी बागेस संरक्षित पाणी देणं आवश्यक आहे. संत्रा बागेत बऱ्याचशा भागात मागील महिन्यात जोराचा पाऊस झालाय अशाठिकाणी बागेत पाणी साचल्याने फळगळ झाली होती. अशा बागेत वाफसा लवकर येण्यासाठी दोन ओळीत चर काढून घ्यावा. काही भागात ढगाळ वातावरणामुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यान फळगळ दिसत आहे. काही भागात अजूनही पुरेसा पाऊस नसल्यान बागेला ताण बसला आहे. त्यामुळे देखील फळगळ दिसत आहे. अशा बागांमध्ये एक टक्का पोटॅशिअम नायट्रेटची फवारणी करा. यामुळे झाडावरील ताण कमी होऊन बागेचे, पोषण होण्यास मदत होईल. मागील काही दिवसांपासून वातावरण उष्ण, दमट आहे. त्यामुळे केळीवर 'पोंगा कूज' या रोगाचा प्रार्दुभाव होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोंगा आणि जमिनीलगतचा बुंधा कुजतो. अशा बागेला वेळापत्रकानुसार रासायनिक खतांच्या मात्रा द्याव्यात. कांदेबाग केळीच्या घडांची कापणी योग्यवेळी करावी.

# दुष्काळ परिस्थिती पाहणीसाठी केंद्राचे पथक महाराष्ट्रात येणार

**मुंबई (प्रतिनिधी)**–राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह अनेक मंत्र्यांनी दुष्काळ पाहणी दौरा केला असून मराठवाड्यासह, विदर्भात पाऊस नसल्याने भीषण परिस्थिती ओढवली आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या अहवालानुसार ट्रीगर १ परिस्थिती असलेल्या राज्यातील २५६ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार, येथील शेतकऱ्यांना आणि नागरिकांना काही सोयी-सुविधा देण्यात येत आहेत. एकीकडे राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला असला तरीही महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश भूभाग दुष्काळाने प्रभावित झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनेही परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. त्याच, पार्श्वभूमीवर केंद्राचे पथकही दुष्काळ पाहणीसाठी महाराष्ट्रात येत आहे.

दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रात केंद्रीय पथक पाठविण्यात येणार असून, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राज्याचा दौरा करणार असल्याची माहिती त्यांनी नवी दिल्लीतील पुसा येथील राष्ट्रीय कृषी संमेलनरब्बी अभियान २०२६



च्या उद्घाटन सत्रात दिली. ३ ऑक्टोबर नंतर केंद्रीय पथक महाराष्ट्रात दौरा करणार असल्याचे समजते. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामातील पीक नियोजन हे उपलब्ध पाण्याचा ताळेबंद, जमिनीतील ओलावा आणि सिंचनाची उपलब्धता लक्षात घेऊन करण्याचे आवाहन केंद्रीय मंत्री चौहान यांनी केले. पाणीटंचाई असलेल्या भागात कमी पाण्यात येणाऱ्या कडधान्ये आणि तेलबिया पिकांना प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. धान कापणीनंतर रिकाम्या राहणाऱ्या क्षेत्रात हरभरा, मसूर आणि मोहरीसारख्या पिकांची लागवड वाढविण्यावर भर देण्यात आला.

रब्बी हंगामासाठी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठांचा आगाऊ आराखडा तयार ठेवण्याच्या तसेच शेतकऱ्यांना योग्य वाण आणि पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. खतांचा संतुलित वापर करण्यासाठी 'खेत बचाओ' अभियान रब्बी हंगामातही राबविण्यात यावे, असे चौहान यांनी सांगितले. तसेच फार्मर आयडी, एग्रीस्टॅक आणि किसान क्रेडिट कार्डचे कव्हरेज वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

रब्बी हंगामात पेरणीची प्रगती, उगवण, रोगांचा प्रादुर्भाव आणि बाजारभाव यांचा दर आठवड्याला आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. महाराष्ट्रासह कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीचा केंद्रीय पथकाकडून प्रत्यक्ष आढावा घेतला जाणार असून, २९ सप्टेंबर रोजी सर्व राज्यांच्या कृषिमंत्र्यांसोबत होणाऱ्या चर्चेत रब्बी हंगामासाठी समन्वित आणि परिणामाभिमुख कृती आराखडातयार करण्यात येणार आहे.

विदर्भ मराठवाड्यासह कोकणातही दुष्काळाची परिस्थिती पाहायला मिळत आहे. मात्र, रत्नागिरीत तीनच तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आले असून करपलेल्या भातशेतीकडे पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आल्याचं दिसून आलं. पावसाअभावी हातची शेती गेल्याने चिपळूणसह इतर तालुक्यांनाही दुष्काळी मदतीची मागणी केली जात आहे. करपलेली भातशेती... डोळ्यांसमोर उभं राहिलेलं नुकसान... आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यात तरळलेले अश्रू! रत्नागिरी जिल्ह्यात केवळ तीन तालुके दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात आल्याने चिपळूणमधील शेतकऱ्यांनी सरकारच्या निर्णयावर सवाल उपस्थित केला आहे. सप्टेंबरअखेरपर्यंत अपेक्षित पाऊस न झाल्याने अनेक भागांत भातशेती करपली आहे. बियाणे, खत आणि मजुरीवर केलेला खर्च वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. यंदा सरासरीच्या सुमारे ७५ टक्केच पाऊस झाल्याने पुढील काळात पाणीटंचाईचीही चिंता आहे. त्यामुळे चिपळूणसह इतर तालुक्यांचाही दुष्काळी निकषांमध्ये विचार करून तातडीने मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

# 'लालपरी' आता होणार 'ई-लालपरी'; २०३७ पर्यंत १०० टक्के इलेक्ट्रिक बसेसचे लक्ष्य




**मुंबई (प्रतिनिधी)**–महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात धावणाऱ्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात आता मोठा बदल होणार आहे. सन २०३७ पर्यंत एसटीचा १००% ताफा इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामुळे पारंपरिक डिझेल बसेसचे प्रमाण टप्प्याटप्प्याने कमी होऊन भविष्यात महाराष्ट्राची 'लालपरी' 'ई-लालपरी' म्हणून धावणार आहे.

परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. एसटीच्या मुख्यालयात झालेल्या महामंडळाच्या ३१२ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत या योजनेबाबत चर्चा करण्यात आली.

सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात सुमारे १४,००० बसेस आहेत. त्यापैकी सुमारे १,१०० बसेस ई-बसेस आहेत. दरम्यान, ताफ्यात दाखल होणाऱ्या सुमारे ५,००० नवीन डिझेल बसेस या शेवटच्या डिझेल बसेस ठरणार असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. त्यानंतर नव्या बसेसची खरेदी प्रामुख्याने इलेक्ट्रिक स्वरूपात केली जाणार आहे.

एसटीच्या ७ ते ८ वर्षे वापरलेल्या जुन्या बसेसचे २०२७ पासून टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिक बसेसमध्ये रूपांतर करण्याची मोहीम सुरू केली जाणार आहे. प्रवाशांची गरज लक्षात घेऊन नव्या ई-बसेसची मोठ्या प्रमाणावर खरेदीही केली जाणार आहे.

सध्या डिझेल बसेसचे आयुर्मान सुमारे १५ वर्षे, तर ई-बसेसचे आयुर्मान सुमारे २० वर्षे आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक बसेसचा अधिक काळ वापर करता येणार असून, डिझेलवरील अवलंबित्व कमी झाल्याने इंधन खर्चातही बचत होण्याची अपेक्षा आहे

# उसाची शेतं इथेनॉलच्या विहिरी व्हाव्यात -राज्यपाल हरिभाऊ बागडे



**मुंबई (प्रतिनिधी)** –इथेनॉलचे उत्पादन, प्रसार आणि वापर वाढवला तर आंतरराष्ट्रीय पेट्रोलियम बाजारातील चढउतार आणि भू-राजकीय धोक्यांपासून देश सुरक्षित राहील, असे ठाम प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सोमवारी केले.

ऊसाची शेतं ही इथेनॉलच्या विहिरी आणि जलाशयांसारखी व्हायला हवीत या क्षेत्रात आपण जगाचे नेतृत्व केले पाहिजे, असे बागडे म्हणाले. भारत इथेनॉल फोरम, ग्लोबल टर्मरिक कॉन्क्लेव्ह, मका बाजार परिषद व प्रदर्शन आणि बायो रिसोर्सेस व सर्क्युलर इकॉनॉमी परिषद व प्रदर्शन या चार परिषदांच्या संयुक्त व्यासपीठावरून ते बोलत होते.

इथेनॉलला चालना दिल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे कौतुक केले.

महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष आणि सहकारी साखर कारखानदारीचा दांडगा अनुभव असलेले बागडे म्हणाले, देशात इथेनॉल मिश्रणाची सुरुवात अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात झाली. तेव्हा राम नाईक पेट्रोलियम मंत्री होते. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याचा पहिला प्रायोगिक प्रकल्प महाराष्ट्रातील मनमाड येथे सुरू झाला, जिथे पेट्रोल-डिझेलचे मोठे डेपो आहेत. त्या वेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणून मी तिथे उपस्थित होतो.

साखर कारखाने केवळ साखरेवर तग धरू शकत नाहीत. त्यांचे अर्थकारण उपपदार्थांवर अवलंबून असते. फक्त साखर तयार करणाऱ्या अनेक सहकारी कारखान्यांना मोठा तोटा सहन करावा लागला. पुढे वीजनिर्मितीसाठी सहवीज प्रकल्प आले, त्यानंतर इथेनॉल प्रकल्प आणि स्वतःच्या डिस्टिलरी उभ्या राहिल्या. केंद्र सरकारच्या भक्कम पाठबळामुळे आणि भांडवली अनुदानामुळे इथेनॉल प्रकल्प महाराष्ट्रासह देशभर झपाट्याने वाढले, असे राज्यपालांनी सांगितले.

इथेनॉल केवळ उसाचा रस आणि मळीपासूनच नाही, तर मका आणि शेतीतील कचऱ्यापासूनही तयार होते. धातू, दगड किंवा प्लास्टिक सोडून जवळपास कोणत्याही सेंद्रिय पदार्थापासून थोडे का होईना इथेनॉल मिळू शकते, असेही ते म्हणाले.

शेतकऱ्यांसाठी साखर कारखाने आवश्यक आहेतच; पण ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करायची असेल आणि ऊस उत्पादकांना वेळेवर पैसे द्यायचे असतील, तर इथेनॉल उत्पादन अत्यावश्यक आहे, असे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

हळदीतून शेतकऱ्याला एकरी किमान एक लाख रुपयांचे उत्पन्न मिळते, तरीही या पिकाकडे आजवर पुरेसे लक्ष दिले गेले नाही, अशी खंत आमदार आणि वसमत येथील बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांनी व्यक्त केली.

हिंगोली, नांदेड, वाशीम, परभणी, वर्धा आणि यवतमाळ, म्हणजेच प्रसिद्ध वायगाव हळदीचा पट्टा, देशाच्या एकूण हळद उत्पादनात जवळपास निम्मा वाटा उचलतो. पूर्वी इथे संशोधनाची कोणतीही सोय नव्हती. शेतकरी हळद पिकवायचे, पण ती सांगलीच्या नावाने विकली जायची, कारण देशातील पहिला हळद वायदे बाजार आणि बाजार समिती सव्वाशे वर्षांपूर्वी सांगलीत सुरू झाली. आता वसमतच्या हळदीला भौगोलिक मानांकन (जीआय) मिळाले असून आम्ही ती आमच्या स्वतःच्या नावाने बाजारात आणत आहोत. आमचे संशोधन केंद्र अनेक आघाड्यांवर काम करत आहे, असे त्यांनी सांगितले.

# 'कंट्रोल' सोडा, 'कनेक्शन' ठेवा; प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांचे पालकांना आवाहन

**अहमदपूर (प्रतिनिधी)** –आजच्या तरुण पिढीला दाब नाही, तर मान-सन्मान हवा आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या पाल्यांवर दबाव न टाकता त्यांना समजून घ्यावे. महाविद्यालय त्यांना घडवते, तुम्ही फक्त त्यांना समजून घ्या. पालकांनी मुलांना 'कंट्रोल' करण्यापेक्षा त्यांच्याशी 'कनेक्शन' ठेवावे, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक, ज्येष्ठ कादंबरीकार तथा प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांनी केले.

महात्मा फुले महाविद्यालयात आयोजित पालक मेळाव्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी, हिंदी विभाग प्रमुख डॉ. नागराज मुळे, मेळाव्याचे संयोजक डॉ. सतीश ससाणे, पालक प्रतिनिधी नारायण इंगोले, सौ. सुजाता सुरनर आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. बिरादार म्हणाले, महाविद्यालयात विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक आहे. पाल्यांना नियमित-पणे महाविद्यालयात पाठवा. जर आपला मुलगा सतत मोबाईल वापरत असेल, तर त्याला 'मोबाईल वापरू नको' असे सांगण्यापूर्वी पालकांनी स्वतः मोबाईलचा अतिवापर टाळला पाहिजे. तसेच कधीही




आपल्या मुलांची तुलना इतर मुलांशी करू नका.

आम्ही विद्यार्थ्यांना केवळ बी.ए.ची पदवी देत नाही, तर त्यासोबत रोजगारक्षम कौशल्ये देतो. यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, प्लेसमेंट सेल असे विभाग कार्यरत आहेत. गतवर्षी अनेक विद्यार्थ्यांचे कॅम्पस सिलेक्शन झाले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. दुर्गादास चौधरी म्हणाले, पालकांनी उच्च शिक्षणाबाबत उदासीन न राहता आशावादी असले पाहिजे. आजचे शिक्षण केवळ नोकरी देणारे नसून, मानवी जीवनाला आकार देणारे आहे. तर डॉ. नागराज मुळे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे करणारे आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करून त्याचा लाभ घ्यावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक डॉ. सतीश ससाणे यांनी केले, तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बब्रुवान मोरे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व परिसरातील पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## द्वितीय पुण्यस्मरण



**कै. श्रीपाद सखारामपंत नर्सीकर**

"अपार कष्ट सोसले स्वसुख भोगायचे राहून गेले
थोरा मोठ्यांना जीव लावला सर्वांच्या
आता उरली नाही साथ आम्हाला
वाट पाहतो तुमची यावे पुन्हा जन्माला"

**भावपूर्ण श्रद्धांजली**

**:: अभिवादनकर्ते ::**

श्रीमती सुजाता श्रीपाद नर्सीकर (पत्नी)
श्रीमती विजया सुभाष नर्सीकर (भावजय)
चि. अभिषेक श्रीपाद नर्सीकर (मुलगा)
चि. समीर सुभाष नर्सीकर (पुतण्या)
चि. श्रीराम सुभाष नर्सीकर (पुतण्या)
सौ. दिपाली समीर नर्सीकर, सौ. नम्रता श्रीराम नर्सीकर,
सौ. श्रद्धा अभिषेक नर्सीकर (सून)
कु. ईशिता, चि. शिवा व चि. कार्तिक


# महावितरणच्या वीजयंत्रणेत खासगी व्यक्तींकडून कामे करून घेतल्यास थेट बडतर्फीसारखी कारवाई

**मुंबई (प्रतिनिधी)**–महावितरणच्या वीज-यंत्रणेमधील नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर बदलणे, तांत्रिक दुरुस्ती, वीजबिल वसूली किंवा मीटर काढणे यासारखी कामे विद्युत सुरक्षा नियमांचे पालन करून करण्याची पूर्णतः जबाबदारी तारमार्ग संवर्गातील तांत्रिक कर्मचाऱ्यांची आहेत. अशी तांत्रिक व जोखमीची कामे करवून घेण्यासाठी कोणत्याही प्रकारे खासगी व्यक्ती किंवा अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करू नये. असे प्रकार आढळून आल्यास व विद्युत अपघात झाल्यास संबंधित दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध बडतर्फीसारखी कठोर कारवाई करण्यात येईल असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी नुकतेच परिपत्रक काढून क्षेत्रीय मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंत्यांना याबाबत खातरजमा करण्याचे आदेश दिले आहेत.

महावितरणच्या वीज वितरण यंत्रणेचे सुरक्षित संचालन, देखभाल व दुरुस्ती आणि ग्राहकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करणे हे प्रत्येक संबंधित अभियंता व तांत्रिक कर्मचाऱ्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे. वीज यंत्रणेमध्ये प्रत्यक्ष कामे करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तारमार्ग संवर्गामध्ये प्रधान तंत्रज्ञ, वरिष्ठ तंत्रज्ञ आणि तंत्रज्ञ यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. या कर्मचाऱ्यांवर नादुरुस्त वितरण रोहित्र बदलणे, डीओ फ्यूज बदलणे, विद्युत वाहिनीमधील बिघाड शोधणे, वीज पुरवठ्याच्या ग्राहक तक्रारी सोडवणे, वीजबिलांची वसूली करणे आणि थकबाकीदार ग्राहकांचे मीटर काढून आणणे यासारख्या कामांची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे.

तथापि, महावितरणचे काही तारमार्ग कर्मचारी ही कामे स्वतः करण्याऐवजी खासगी व्यक्ती किंवा अनधिकृत मनुष्यबळाचा वापर करून घेत असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहे. याबाबतच्या तक्रारी मुख्यालयस्तरावर प्राप्त झाल्या आहेत. महावितरणच्या वीजयंत्रणेतील कामांसाठी खासगी व अनधिकृत व्यक्तींचा वापर करणे अत्यंत गंभीर बाब आहे. अशा अनधिकृत व्यक्तींकडे पुरेसे तांत्रिक ज्ञान व सुरक्षेचे प्रशिक्षण नसते. त्यामुळे विद्युत व यांत्रिक अपघात घडून संबंधित खासगी व्यक्ती तसेच कर्मचाऱ्यांचा अपघात होण्याची मोठी शक्यता आहे. याशिवाय वीज ग्राहक व महावितरणच्या मालमत्तेचे नुकसान सहन करावे लागते.

'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी अथॉरिटी (मेझर्स रिलेटिंग टू सेफ्टी अ‍ॅण्ड इलेक्ट्रिक सप्लाय) रेग्युलेशन्स २०२३' मधील नियम ३ नुसार केवळ अधिकृत व्यक्तीच वीज वितरण सेवेशी संबंधित कामे करू शकते किंवा विद्युत वाहिन्या व उपकरणांवर काम करण्यास पात्र असते. त्यामुळे महावितरणकडून अधिकृतपणे नामनिर्देशित न केलेल्या किंवा अपात्र खासगी व्यक्तीस वीज यंत्रणेवर कोणत्याही प्रकारचे काम करण्यास परवानगी देणे अथवा त्याच्याकडून काम करून घेणे हे पूर्णपणे बेकायदेशीर व अनधिकृत कृत्य आहे.

## एकल माता कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र धोरणाचा मार्ग मोकळा

**मुंबई (प्रतिनिधी)** –एकल माता पालक कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना भेडसावणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याच्या दिशेने राज्य सरकारने पुढचे पाऊल टाकले आहे. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य, विविध सुविधा आणि संरक्षण देण्याच्या उद्देशाने प्रस्तावित 'शैक्षणिक सहाय्य, संरक्षण आणि सक्षमीकरण धोरण-२०२६'साठी गठित करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे.

**पान १ वरून...**

**दोन चिमुकल्यांचा खून...**

गळफास घेतला, परंतु त्यांना तात्काळ नातेवाईकांनी शहराच्या अण्णाभाऊ साठे चौक परिसरातील तुकामाई या खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. हॉस्पिटलने एमएलसी क्रमांक ४०० नुसार शिवाजीनगर पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन जबाब घेण्याचा प्रयत्न केला, परंतु रुग्ण हे बेसुद्ध अवस्थेत असल्याने त्यांची बहीण लता कवठेकर यांनीच पोलिसांना जबाबात गळफास घेतल्याचे सांगितले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा सोमवार दिनांक २८ सप्टेंबर रोजी मृत्यू झाला. शिवाजीनगर पोलीस निरीक्षक राजेश पुरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी रिक्वेस्ट पंचनामा करून शवविच्छेदनासाठी सदरचा मृतदेह शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे पाठवून त्यानंतर मयताचा भाऊ जयप्रकाश कवठेकर यांच्या ताब्यात देण्यात आला. त्यांच्याच फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे पुन्हा एकदा जिल्हा परिषदेतील शिक्षण विभाग चव्हाट्यावर आला आहे.

**मुख्य निवडणूक आयुक्त...**

महेश चव्हाण, विजय सोंडारे, पंजाब चव्हाण, अलिम खान, सय्यद रिहान, उत्कर्ष सोंडारे, गोविंद पाटील, किशन कदम, प्रसेनजित वाघमारे, अब्दुल वहाब, भिवाजी कदम, अनिल कदम, अमोल कदम, श्रीकांत जोगदंड, प्रल्हाद गव्हाणे, देविदास कदम, एस.पी. कुंभारे, लतीफ शेख, नुरोद्दीन शेख, प्रभू उरुदवाड, शेख असलम, आदित्य सोंडारे, प्रकाश दिपके, अजहर शेख आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मुदखेडच्या शेतकऱ्यांचा तहसील...**

इतर दुष्काळी सवलती व शासकीय लाभांचा शेतकऱ्यांना लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांची खरी परिस्थिती सरकारने आणि प्रशासनाने प्रत्यक्ष पाहावी. शेतकऱ्यांची खरीप पिके उद्ध्वस्त झाली असताना मुदखेडला दुष्काळी यादीतून वगळणे हा शेतकऱ्यांवर अन्याय आहे. दुष्काळी यादीत समावेश न झाल्याने शेतकरी कर्ज पुनर्गठन आणि इतर दुष्काळी सवलतींपासून वंचित राहू शकतो. त्यामुळे शासनाने कोणताही विलंब न करता मुदखेड तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा, अशी मागणी बालाजी गाडे पाटील यांनी केली.

यावेळी तिरुपती पाटील कोंढेकर, माजी नगरसेवक गोविंदराव गोपनपल्ले, गिरीश कोत्तावार, गटनेते प्रतिनिधी मुजीब पठाण, शिवानंद देवके, सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर पाटील मगरे, विठ्ठल आचार्य, शेख अनिस, रमेश बोडके, गंगाधर पांचाळ, भीम पाटील महादवाड, गौस मुल्ला, गजानन चंद्रे, माणिका मुंगल, राजू चौदंते, केशव पाटील शिंदे, आनंदा ढगे, तुकाराम ढगे, नागोराव खांबाळा, गोविंद मेंडका, महादेव मेंडका, शिवाजी वडजे, विश्वनाथ पवार निवघेकर, गणपत शिंदे, शाम शिंदे, प्रकाश शिंदे, राजेश पवार, नागोराव भांगे, आनंदराव पवार, योगेश पवार, अनिल पवार, सतीश पाटील, मदन देशमुख आदी उपस्थित होते.


## जाहीर प्रगटन

मौजे ढाकणी ता. लोहा, जि. नांदेड हद्दीतील शेत गट नं. ६० क्षेत्रफळ ०० हेक्टर २५ आर पो.ख. क्षेत्रफळ ० हेक्टर २ आर शेत जमीन पुरणसिंघ फत्तेहसिंघ सिद्धू रा. लाभनगर तरोडा खु. नांदेड यांच्याकडून तेजविंदरसिंघ गुरुमुखसिंघ सिद्धू रा. नवीन कौठा म्हाडा कॉलनी, नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**शेत जमिनीची चतुःसिमा–**
पूर्वेस –संभाजी श्रीराम शिंदे,
पश्चिमेस –महेंद्रसिंघ ध्यानसिंघ पैदल,
दक्षिणेस –लिहून घेणार व देवेंद्रसिंघ सिद्धू
उत्तरेस –बालाप्रसाद सूर्यभान चिलपिंपरे

तरी वरील चतुःसिमेच्या आतील शेत जमिनीबद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर शेत जमिनीचे खरेदीखत तेजविंदरसिंघ गुरुमुखसिंघ सिद्धू यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**तेजविंदरसिंघ गुरुमुखसिंघ सिद्धू**
**रा. नवीन कौठा, म्हाडा कॉलनी, नांदेड मो. ७६२०७९७०७९**



## शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेड

मुख्य कार्यालय, नवा मोंढा, नांदेड

# ...शुभारंभ...

UPI UNIFIED PAYMENTS INTERFACE
IMPS IMMEDIATE PAYMENT SERVICE

UPI. Mobile Banking, IMPS

सेवा (फोनपे/गुगल पे)

ग्राहकांना समर्पित...!

तरी ग्राहकांनी आपल्या नजीकच्या शाखेला भेट देऊन सदर सेवेचा लाभ घ्यावा ही विनंती.

विनीत

सर्व संचालक मंडळ/सर्व कर्मचारी वृंद

शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेड



## Change In Name

My Name is Osman Farooqui My Mother's Old Name: **NUZHAT FATEMA ANSARI** which now changing as New Name: **FAROOQI NUZHAT FATEMA** Hence forth, my all correspondence will be done as per my New Name please consider this public declaration.

**Address:** 6- 4- 204, Ansari Complex Bagwan Galli Sarafa, Itwara, Nanded, 431604 Maharashtra, INDIA.
Mobile No: 7385131256

## Change In Name

My Name is Osman Farooqui My Father's Old Name is **MOHAMMED HABIBUDDIN FAROOQI** which now I am changing as New Name: **FAROOQI MOHAMMED HABEEBUDDIN,** Hence forth, my all correspondence will be done as per my New Name please consider this public declaration.

**Address:** 6- 4- 204, Ansari Complex Bagwan Galli Sarafa, Itwara, Nanded, 431604 Maharashtra, INDIA. Mobile no: 7385131256

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# विरोधी पक्षाकडून संविधान हातात घेऊन संवैधानिक संस्थांवरचा हल्ला खपवून घेणार नाही

## ईव्हीएमनंतर आता निवडणूक आयोगाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न -खा. अशोकराव चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** निवडणूक आयोगात मतभेद असल्याच्या चर्चेला मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन आयुक्तांनी संयुक्त निवेदन जारी करून पूर्णविराम दिला आहे, असा दावा माजी मुख्यमंत्री तथा भाजपचे राज्यसभेतील खासदार अशोकराव चव्हाण यांनी केला. विरोधकांनी निवडणूक आयोगावर संशय व्यक्त करण्याऐवजी मतदार याद्या अधिक अचूक आणि पारदर्शक करण्याच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन करत देशातील विरोधी पक्ष नेता व विरोधी पक्ष हातात संविधान घेऊन संवैधानिक संस्थांवरच संशय व्यक्त करून देशात अराजकता माजविण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप खासदार चव्हाण यांनी केला, परंतु या घटनात्मक संस्थांवरील होणारा घाला भारतीय जनता पक्ष कदापी सहन करणार नाही, असेही खासदार



अशोकराव चव्हाण म्हणाले.

भाजपच्या वतीने सोमवार, दिनांक २८ सप्टेंबर रोजी शहराच्या हॉटेल चंद्रलोक येथे आयोजित पत्रकार परिषदेत खासदार चव्हाण बोलत होते.

यावेळी आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार डॉ. तुषार राठोड, महापौर कविता मुळे, प्रदेश उपाध्यक्ष चैतन्यबापू देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे, ॲड. किशोर देशमुख, डॉ. सचिन पाटील उमरेकर, निलेश देशमुख यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना खासदार चव्हाण म्हणाले की, आयोगाच्या तिन्ही आयुक्तांनी संयुक्त निवेदन प्रसिद्ध करून निर्णय प्रक्रियेत कोणतेही मतभेद नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आयोगात अंतर्गत संघर्ष असल्याचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न चुकीचा आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडून ईव्हीएम आणि आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. घटनात्मक संस्थांबद्दल जनतेमध्ये संभ्रम निर्माण करू नये. कॅबिनेट सचिवांकडे पाठवलेले पत्र हे धोरणात्मक निर्णयाशी संबंधित नसून, एका अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीशी संबंधित असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. त्या पत्राला वेगळे राजकीय स्वरूप देऊन आयोगात मतभेद असल्याचे चित्र रंगवले जात आहे, असा आरोप त्यांनी केला.

नवीन मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म क्रमांक ६ वरूनही संभ्रम निर्माण केला जात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार निर्धारित प्रक्रियेतच हा फॉर्म वापरला जात आहे. निवडणूक जिंकल्यानंतर आयोग योग्य आणि पराभवानंतर आयोग चुकीचा, ही भूमिका राजकीय पक्षांनी सोडावी, असा टोला त्यांनी काँग्रेसला लगावला. तेलंगणा, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटक येथील निवडणूक निकालांचा दाखला देत त्यांनी विरोधकांच्या आरोपांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# हजूर साहिब नांदेड स्थानकावर टीसींवर हल्ला; १० तिकीटविरहित प्रवाशांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर कर्तव्यावर असलेल्या तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांवर तिकीटविरहित प्रवाशांच्या गटाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी लोहमार्ग रेल्वे पोलिसांनी १० जणांना ताब्यात घेऊन भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ५.३० वाजता हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकावर विशेष तिकीट तपासणी मोहीम सुरू होती. प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर दोन तिकीट तपासणी कर्मचारी तपासणी करत असताना, धर्माबादहून मनमाडकडे जाणारी गाडी क्रमांक १७६८८ मराठवाडा एक्सप्रेसमध्ये प्रवाशांचा एक गट चढण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

कर्तव्याचा भाग म्हणून दोन्ही टीसी संबंधित प्रवाशांची तिकिटे तपासण्यासाठी गेले असता, सुमारे १४ जणांच्या गटाने कोणतीही चिथावणी नसताना त्यांच्यावर हल्ला केला. यावेळी त्यांनी टीसी आर. के. सिंह यांना गाडीत ओढून नेले.

घटनास्थळी उपस्थित असलेले दुसरे टीसी जितेंद्र कुमार यांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना यश आले नाही. दरम्यान, सकाळी ५.३२ वाजता गाडी सुरू झाली. प्रकार लक्षात येताच ट्रेन मॅनेजर (मुख्य गार्ड) यांनी प्रसंगावधान राखत गाडी थांबवली.

यानंतर प्लॅटफॉर्मवरील अन्य तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांना माहिती देण्यात आली. सर्व कर्मचारी तातडीने प्लॅटफॉर्म क्रमांक २ वर पोहोचले आणि आरपीएफच्या मदतीने गाडीतील संबंधित प्रवाशांना खाली उतरवण्याचा प्रयत्न केला. या कारवाईदरम्यान ४ जण पळून गेले, तर उर्वरित १० प्रवाशांना आरपीएफच्या मदतीने तिकीट निरीक्षक कार्यालयात आणण्यात आले.

**टीसी जखमी, रेल्वे रुग्णालयात उपचार**

या हल्ल्यात टीसी आर. के. सिंह जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी रेल्वे रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तेथे त्यांची वैद्यकीय-विधी केस म्हणून नोंद करण्यात आली आहे.

त्यानंतर तिकीट तपासणी कर्मचारी आणि आरपीएफ कर्मचाऱ्यांनी १० प्रवाशांना नांदेड येथील लोहमार्ग रेल्वे पोलीस ठाण्यात सुपूर्द केले. जीआरपीने कर्तव्यावर असलेल्या सार्वजनिक सेवकाला दुखापत करणे आणि कर्तव्यात जाणूनबुजून अडथळा आणणे आदी कलमांन्वये भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे.

# डीआयजी उमाप यांच्या पथकाची नांदेडमध्ये अवैध दारुविरुद्ध कारवाई; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातून ग्रामीण भागात दारूची अवैधपणे वाहतूक होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यावरून, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्याकडील अधिकारी व अंमलदारांचे एक पथक नांदेड शहरात रवाना केले होते.

सदर पथकाने दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी पोलीस ठाणे भाग्यनगर हद्दीतील सौभद्र मंगल कार्यालयासमोर सापळा रचून, देशी-विदेशी दारूची अवैधरीत्या वाहतूक करत असलेली एक टाटा टियागो कार पकडून, त्यामधील २ लाख ४७ हजार ५३० रुपयांची देशी विदेशी दारु व सुमारे ३ लाख रुपयांचे वाहन असा एकूण ५ लाख ४७ हजार ५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणात, विशाल दिलीप राठोड, रा. तोंडापूर तांडा ता. कळमनुरी, जि. हिंगोली यास ताब्यात घेवून त्याचेविरुद्ध पोलीस



ठाणे भाग्यनगर येथे गुरनं ५५४/२०२६ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोलीस हवालदार प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे व गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

# मुखेडला दुष्काळाच्या यादीत घ्या, अन्यथा १ ऑक्टोबरला रास्ता रोको; बेटमोगरेकरांच्या नेतृत्वात दुष्काळी जीआरची होळी

**नांदेड (प्रतिनिधी)–** मुखेड तालुक्यात कोरड्या दुष्काळामुळे खरीप हंगामातील उभी पिके होरपळून गेली असतानाही राज्य सरकारच्या दुष्काळी यादीतून मुखेड तालुक्याला वगळण्यात आल्याच्या निषेधार्थ शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी मुखेड तहसील कार्यालयासमोर सरकारच्या दुष्काळी जीआरची होळी केली.

मुखेड तालुक्याचा Trigger १ दुष्काळाच्या यादीत तातडीने समावेश न केल्यास १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता तहसील कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना तहसीलदार अभयराज निंजुडे यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. यावेळी शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, यंदाच्या खरीप हंगामात पावसाने मोठी ओढ दिल्याने हातातोंडाशी आलेली पिके वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. असे असताना Trigger १ अंतर्गत दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये मुखेडचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे दुष्काळी उपाययोजना व विविध सवलतींपासून



तालुक्यातील शेतकरी वंचित राहणार असून, शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

मुखेडच्या तुलनेत कमी पर्जन्यमान असलेल्या किनवट, अर्धापूर आणि लोहा तालुक्यांचा दुष्काळी यादीत समावेश करण्यात आला आहे, मात्र मुखेडला वगळण्यात आल्याने सरकारच्या निकषांबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. मुखेडचा Trigger १ यादीत तातडीने समावेश करून दुष्काळी उपाययोजना लागू कराव्यात, पीकविमा लागू करावा तसेच शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयांचे अनुदान द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी राजीव पाटील रावणगावकर, माधवराव पाटील उंद्रीकर, हणमंत नारनाळीकर, चंद्रकांत घाटे, संजय रावणगावकर, विकास पाटील ताटे, सुभाष पाटील पाळेकर, शंकर पाटील जांभळीकर, शौकत पठाण, शिवाजी पाटील बेळीकर, बालाजी सुडके, मगदूम पठाण कुरेशी, जगदीश कांबळे, हरिदास पाटील, हणमंत मुगवणे, संदीप पाटील उंद्रीकर, बालाजी बंडे, गोपीनाथ श्रीमंगले, सुभाष पाटील, वलियोद्दीन शेख, माधव पाटील, बाळासाहेब नागरगोजे, किशोर जोशी, इरफान मोमीन, माणिक पाटील भगनूरकर, माधव जमजाळ, संभाजी घंटेवाड, मधुकर जुने, नागनाथ पाटील बेळीकर, रामकिशन पाटील, संजय नकुलवार, संभाजी पाटील जुने, बालाजी राठोड, संभाजी पाटील लवटे आदींसह तालुक्यातील शेतकरी, सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते.

# नगरसेवक डॉ. अभिषेक सौदे यांचा एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अडचणीत सापडलेल्या शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अभिषेक सौदे यांनी आपले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्याचा निर्णय घेतला आहे.



दुष्काळामुळे शेतकरी आणि ग्रामीण भागासमोर निर्माण झालेल्या संकटाच्या काळात सामाजिक बांधिलकी जपत हा निर्णय घेतल्याचे डॉ. सौदे यांनी सांगितले.

शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. संकटाच्या काळात शेतकरी बांधवांच्या पाठीशी उभे राहणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. माझ्या परीने मदतीचा हात पुढे करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे, असे डॉ. अभिषेक सौदे यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध सवलती व उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

# किनवट येथील महाघोटाळा प्रकरणात चौथा आरोपी जेरबंद!



**किनवट (प्रतिनिधी)–** येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील तब्बल साडेसोळा कोटी रुपयांच्या अफरातफर प्रकरणात नांदेडच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील खासगी संगणक ऑपरेटर संतोष रमेश मारपवार रा.साठेनगर किनवट याला रविवार, दि. २७ रोजी रात्री ताब्यात घेतले होते. सोमवार, दि.२८ रोजी त्याला किनवटच्या दिवाणी न्यायालयात हजर केले असता, न्या. प्रदीप माने यांनी या चौथ्या आरोपीसही दि.३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

किनवटच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी पोलिसांनी दि.२० सप्टेंबर रोजी मुख्य आरोपी तथा वरिष्ठ लिपीक व रोखपाल भगवान डवरे याच्यावर गुन्हा दाखल केला होता. नांदेडच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवार, दि. २६ रोजी भगवान डवरे व त्याचे साथीदार संतोष भडंगे, निरंजन मिरासे यांना गोव्यातील एका क्लबमधून ताब्यात घेतले होते. मुख्य आरोपी डवरे याची कसून चौकशी केली असता,या गुन्ह्यात संतोष मारपवार या खासगी संगणक ऑपरेटरचा सहभाग असल्याचा कबुलीजबाब नोंदविला. त्यावरून पोलिसांनी रविवारी रात्री संतोष रमेश मारपवार याला किनवटच्या साठेनगरातून ताब्यात घेतले.

# नांदेड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अधीक्षक विवेक मोरे निलंबित

## आर्थिक अनियमितता, कामकाजातील हलगर्जीपणा व संस्थेच्या नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपांवरून कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** दि नांदेड जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नांदेडचे अधीक्षक विवेक नारायण मोरे यांच्यावर संस्थेच्या अध्यक्ष व सचिवांनी निलंबनाची कारवाई केली आहे. संबंधित निलंबन आदेशानुसार मोरे यांच्यावर संस्थेच्या कामकाजात विविध प्रकारच्या अनियमितता व गैरवर्तन केल्याचे आरोप करण्यात आले आहेत.

निलंबन आदेशात नमूद केल्यानुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस आवश्यक ते ताळेबंद व नफा-तोटा पत्रक नियमितपणे सादर न करणे, सन २०१२ ते २०२० या कालावधीतील सुमारे ५९.२८ लक्ष रुपयांच्या अवर्गिकृत (सस्पेन्स) रकमेबाबत आवश्यक माहिती न देणे, तसेच संबंधित रकमेच्या वर्गीकरणात अनियमितता केल्याचे आरोप करण्यात आले आहेत. याशिवाय आयकर विभागाकडून प्राप्त नोटिसांना वेळेत उत्तर न देणे, विनापरवानगी गैरहजर राहणे, संस्थेने सोपविलेली कामे वेळेवर न करणे, लेखा व अभिलेखांच्या कामकाजात त्रुटी ठेवणे, तसेच संस्थेच्या आर्थिक व्यवहारांमुळे आर्थिक नुकसान झाल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

संस्थेच्या तरतुदींच्या रकमा वेळेवर न भरल्यामुळे बँकेकडून संस्थेला सुमारे २.४१ लक्ष रुपयांच्या थकबाकीसंदर्भात नोटीस मिळाल्याचा उल्लेखही आदेशात आहे. तसेच काही सभासदांच्या कर्जप्रकरणांशी संबंधित व्यवहार, जामीनदार बदलणे आणि सभासदांनी सर्वसाधारण सभेत विचारलेल्या प्रश्नांबाबत व्हॉटस्ॲप संदेशाद्वारे मानहानी केल्याचे आरोपही करण्यात आले आहेत.

# नांदेड उत्तर मतदारसंघात दुष्काळी पाहणी

## आ. बालाजी कल्याणकर यांची एकरी ५० हजार मदतीची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** अपुऱ्या पर्जन्यमानामुळे नांदेड जिल्ह्यासह नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार बालाजी कल्याणकर यांनी मतदारसंघातील विविध गावांना प्रत्यक्ष भेटी देत शेतीपिकांच्या नुकसानीची पाहणी केली.

कासारखेडा, नांदुसा, चिखली बुद्रुक, भालकीपासून त्यांनी पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. त्यानंतर ढोकी, पिंपळगाव (कोरका), राहाटी, सोमेश्वर, जैतापूर आदी गावांमध्ये जाऊन त्यांनी शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून



घेतल्या.

पाहणीदरम्यान सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, हळद, केळी तसेच इतर फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. सोयाबीनची वाढ झाली असली तरी पाण्याअभावी शेंगांमध्ये दाणे भरले नसून, अनेक ठिकाणी शेंगा चपट्या होऊन करपल्याचे दिसून आले. कापसावर रोगाचा प्रादुर्भाव होऊन बोंडगळती होत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. हळदीचे कंद उष्णतेमुळे भरत नसल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. केळी आणि इतर फळपिकांचेही पाण्याअभावी नुकसान झाले आहे.

दुष्काळामुळे केवळ शेतकरीच नव्हे, तर शेतमजुरां-समोरही उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, शेतीची कामे ठप्प झाल्याने ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत.

पाहणीनंतर आमदार कल्याणकर यांनी शेतकऱ्यांना पीक नुकसानीपोटी प्रति एकरी ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली. तसेच शेतमजुरांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध कराव्यात, शेतपातळीवरील रस्त्यांची कामे हाती घ्यावीत, जनावरांसाठी पाणी व चारा उपलब्ध करून द्यावा आणि दुष्काळग्रस्त कुटुंबांना तातडीने मदत मिळवून द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

# तलवार-खंजर हल्लाप्रकरणी वजिराबाद पोलिसांकडून ७ आरोपींना अटक

## न्यायालयाने सुनावली पोलीस कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जुन्या वादाचा राग मनात धरून एका तरुणावर खंजर, तलवार आणि दगडाने प्राणघातक हल्ला करणाऱ्या सात आरोपींना वजिराबाद पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना पोलीस कोठडी सुनावली आहे.

फिर्यादी मनोज प्रल्हाद माने (वय ३२, रा. सोमेश कॉलनी, नांदेड) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी फिर्यादी व जखमी शंकर माने हे दुचाकीवर साहित्य आणण्यासाठी जात असताना देगावचाळ येथील हार्डवेअर दुकानासमोर आरोपींनी त्यांना गाठले.

गणेश मंडळाजवळ जास्त बोलत होता, तुला आता खतम करून टाकतो असे म्हणत आरोपींनी शंकर माने यांच्यावर खंजर व तलवारीने वार करून गंभीर जखमी केले. या प्रकरणी वजिराबाद पोलीस




ठाण्यात गु.र.नं. ४८८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १०९(१), १८९(१), १८९(२), १८९(४), १९१(३), १९०, ११८(१), ११५(२), ३५१(१), ३५१(२) सह शस्त्र अधिनियम कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वजिराबाद गुन्हे शोध पथकाने तत्पर तपास करून दि. २४ सप्टेंबर रोजी सातही आरोपींना ताब्यात घेतले.

अटक आरोपींमध्ये रोहित उर्फ सोनू रमेश गोडबोले (२५, रा. देगावचाळ), जब्बा उर्फ आदित्य दयानंद हटकर (१९, रा. देगावचाळ), रोहन माधव नवघडे (२३, रा. देगावचाळ), अजय गौतम थोरात (२५, रा. देगावचाळ), सुजल गणपत बहादुरे (१९, रा. देगावचाळ), अभिजीत भागेंद्र नरवाडे (२६, रा. देगावचाळ), कुणाल रमेश नवरे (१९, रा. देगावचाळ, नांदेड) यांचा समावेश आहे.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट क्र. ४), नांदेड यांनी गुन्ह्याची तीव्रता पाहून सर्व आरोपींना २८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत लोंढे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव आणि उपअधीक्षक रामेश्वर वेंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. अजित कुंभार, सपोनि प्रशांत लोंढे, पोउपनि सुनील बुलंगे आणि गुन्हे शोध पथकातील शिवासांब मठपती, विलास कदम, ज्वालासिंह बावरी, संतोष पोकळे, संतोष पावडे, भाऊसाहेब राठोड, इम्रान पठाण, किशोर जयस्वाल यांनी पार पाडली.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com